नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## सुरक्षा दलाची दहशतवाद्यांसोबत चकमक

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :**
जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सर्च ऑपरेशन गतिमान करण्यात आले आहे. उधमपूर येथील डुडू -बसंतगड भागात सुरक्षा दलाची दहशतवाद्यांसोबत धुमश्चक्री उडाली आहे.

त्यात एक जवान शहीद झाला आहे. तर बारामुल्ला परिसरात सैन्य दलाने दोन दहशतवाद्यांना यमसदनी पाठवले. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात दारूगोळा आणि आयईडी हस्तगत करण्यात आला. पोलिस आणि सुरक्षा दल या संपूर्ण परिसरात सर्च ऑपरेशन करत आहे. जम्मू पोलीस सुद्धा सुरक्षा दलांसह या परिसरात दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत. उधमपूरच्या डुडु-बसंतगड परिसरात चकमक सुरू आहे.

* वर्ष १६ * अंक २९९ * * भंडारा * शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)
* विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## पाकड्यांचे पेकाट मोडा!

पाकिस्तानची निर्मिती झाली. अगदी तेव्हापासून भारतात नको त्या कारवाया करून, वारंवार भारताच्या निरपराध जनतेला विनाकारण त्रास देण्याचे पाकिस्तानचे हातखंडा प्रयोग त्यांच्या पैदाईशी पासून सुरूच आहेत. १९४८ सालामध्ये पाकिस्तानने जेव्हा पहिला प्रयत्न केला. त्या घोळात अर्धे काश्मीर पाकिस्तानने मिळवले. त्यानंतरही म्हणजेच विलीनीकरणावर सही केल्यावर सुद्धा परकीय घुसखोरांना भारताने पळता भुई थोडी केलेली आहे. मग दोन-तीन युद्धे झाली. त्या दोन-तीन युद्धांमध्ये पाकिस्तानने असा काही मार खाल्ला आहे की, त्यांना जगाला तोंड दाखवणे शक्यच नव्हते. हे करताना पाकिस्तानने अमेरिकेकडून त्यावेळी येणाऱ्या पैशाचा भरमसाठ दुरुपयोग केला. तेव्हा अमेरिकेचे पाकवर भलतेच प्रेम होते. १९७१ सालामध्ये तर अमेरिकेचे जंगी सातवे आरमार पाकच्या मदतीला येणार होते. मात्र तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी तेव्हाच्या सोवियत संघाबरोबर करार करून अमेरिकेला प्रत्युत्तर देण्याची तयारी केली. मात्र त्या दरम्यानच्या काळातच पाकी लष्कराने चक्क शरणागती पत्करली. हे जगजाहीर आहे. त्यानंतर या पाकिस्तानने सरळ युद्ध न करता अतिरेकी कारवाया सुरूच ठेवल्या. हेच अतिरेकी आपल्या उरावर बसणार आहेत. हे त्या पाकच्या राज्यकर्त्यांना समजलेच नाही. आता चोही बाजूकडून कोंडी होत असताना भिकेचे कटोरे घेऊन फिरणाऱ्या पाकिस्तानकडून भारत विरोधी कारवाया बंद होण्याचे नाव घेत नाहीत. आपण बरबाद झालो तरी भारताविरुद्ध कारवाया करणे थांबवणार नाही. हा नापाक पाकिस्तानचा राष्ट्रीय धर्म आहे. परवा काश्मीरच्या अंतरंगात म्हणजेच सीमेपासून बरेच दूर असलेल्या पहेलगाम येथे ज्या पद्धतीने त्या मात्रागमनी अतिरेक्यांनी निरपराधांना गोळ्या घातल्या. ते हरामखोर कोणत्याही परिस्थितीत सुटता कामा नयेत. शासनाने यावेळी अत्यंत कडक पवित्रा घेऊन पाकिस्तानच्या दूतावासाला भारतामधून चालू पडण्याचे आदेश दिलेले आहेत आणि आपल्या दुतावासाला परत बोलावण्याची कृती केलेली आहे. त्यावरून आपल्या सरकारने हे सर्व प्रकरण गांभीर्याने घेतलेले दिसते. सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा करार संपवल्याने पाकिस्तानला पाणी-पाणी करावे लागेल. हे सुद्धा सत्य आहे. पाकिस्तानच्या नागरिकांना तात्काळ भारत सोडण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. म्हणजेच आता भारताने पाकला त्यांची औकात दाखवलेली आहे. ज्या अतिरेक्यांनी परवाचे जे नरसंहारक कृत्य केले. त्यांचा बोलविता आणि करविता धनी पाकमध्येच लपलेला आहे. त्याला किंमत देणारे पाकिस्तानचे लष्करच आहे. ही बाब १००% खरी आहे. म्हणूनच या खरीखरी मध्ये आम्हाला त्याचा उल्लेख करावासा वाटतो. भारताने इतक्या वेळा पाकिस्तानचे नाक कापलेले आहे की आता पाकड्यांचे नाक दिसतच नाही. फक्त श्वास घेण्यापुरत्या दोन नळ्या किंवा दोन भोकेच दिसतात. सद्यस्थितीमध्ये भारताच्या गृहमंत्र्यांनी आणि पंतप्रधानांसह सर्व अधिकाऱ्यांनी त्यासोबत ज्या ज्या राज्याचे नागरिक मारले गेले आहेत. त्या त्या राज्यांनी अत्यंत कडक पवित्रा घेतलेला दिसतो. पाकिस्तानचे हे जळमट पार नष्ट केल्याशिवाय भारताला स्वस्त बसता येणार नाही. ७१ च्या युद्धात पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. आतापर्यंत बांगलादेश भारताला आपला समजत होता. पण सध्याचा बांगलादेशचा सर्व अधिकार मिळालेला राज्यकर्ता विनाकारण भारताबरोबर शत्रुत्व वाढवित आहे आणि पाकिस्तानच्या पायाशी लोळण घेत आहे. आता भारतालाही बलुचिस्तान प्रकरणी नक्कीच काहीतरी निर्णय घ्यावा लागेल. परवाचा हल्ला पाकिस्तानला सुखासुखी पचवू देणे. हा माणूसकीचा सत्यानाश ठरेल. त्या नालायक अतिरेक्यांनी जी राक्षसगिरी दाखवली. त्या राक्षसांच्या आणि त्यांच्या राक्षसगिरीचा त्यांच्या इतकाच क्रूरपणे बिमोड करणे. हे आपले प्रथम कर्तव्य समजले पाहिजे. त्या दृष्टीने कारवाई सुरू झाली आहे. ही समाधानाची बाब आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## पहलगाम हल्ल्यावर सर्वपक्षीय बैठक

# कठोर कारवाईचे संकेत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :**
पहलगाम हल्ल्याबाबत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संसदेच्या ॲनेक्स इमारतीत सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली. गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी यांच्यासह अनेक नेते यावेळी उपस्थित होते.

पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी बैठकीत दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारकडून करावयाच्या कारवायांबाबत या बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात येत असले तरी, चर्चेचा अहवाल समोर आला नाही.

तत्पूर्वी, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने गुरुवारी पाकिस्तानी नागरिकांसाठी व्हिसा सेवा तात्काळ प्रभावाने स्थगित केल्या. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की सर्व पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द करण्यात आले आहेत, त्यामुळे त्यांनी भारत सोडावा. ज्यांना वैद्यकीय व्हिसा मिळाला आहे



त्यांना २९ एप्रिल २०२५ पर्यंत भारत सोडावा लागेल.

परराष्ट्र मंत्रालयानेही भारतीयांना पाकिस्तानचा प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उद्या श्रीनगरला जात आहेत.

गुरुवारी दुपारी भारताने आयएनएस सुरत युद्धनौकेवरून या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली. चाचणी यशस्वी झाली. जमिनीवरून समुद्रात हल्ला करण्याची चाचणी यशस्वीरित्या पार पडली.

यापूर्वी, भारताच्या प्रत्युत्तराच्या भीतीने, पाकिस्तानने २४-२५ एप्रिल रोजी कराची किनाऱ्यावरील त्यांच्या विशेष आर्थिक क्षेत्रात जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची चाचणी करण्याची अधिसूचना जारी केली होती. कराची एअरबेसवरून भारताच्या सीमेवरील पाक हवाई दलाच्या तळांवर १८ लढाऊ विमाने पाठवण्यात आली.

भारत सरकारने अटारी सीमा बंद करण्याची घोषणा केल्यानंतर, व्हिसावर भारतात आलेले पाकिस्तानी नागरिक पंजाबमधील अटारी चेकपोस्टवरून परत जात आहेत.केंद्र सरकारने पाकिस्तान सरकारच्या एक्स हँडलवर भारतात बंदी घातली आहे.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने आपल्या नागरिकांना जम्मू आणि काश्मीरला न जाण्याचा सल्ला देणारा एक सल्लागार जारी केला आहे.

पहलगाम हल्ल्याचा निषेध करण्यासाठी श्रीनगरमधील दुकानदारांनी त्यांच्या दुकानांवर काळे झेंडे लावले असून, या हल्ल्याचा निषेध केला आहे.

## दहशतवाद्यांना मातीत घालणार!

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा निर्धार

■ **वृत्तसंस्था**
**पाटणा, दि. २४ :**
मी स्पष्टपणे सांगतो, ज्यांनी हा हल्ला केला, त्यांना मातीत गाडू, पाकिस्तानात लपून बसलेल्या दहशतवाद्यांवर कारवाई होणार, याआधी सर्जिकल स्ट्राइक नंतर एअर स्ट्राइक केला होता.



आताची कारवाई त्यापेक्षा सुद्धा मोठी असेल असे स्पष्ट संकेत पंतप्रधान मोदी यांनी दिलेत. ते बिहारमध्ये एका सभेला संबोधित करत होते.

मोदी म्हणाले, २२ तारखेला दहशतवाद्यांनी पर्यटकांना अत्यंत क्रूरपणे मारले, त्यामुळे संपूर्ण देश व्यथित आहे. दहशतवाद्यांना मातीत घालण्याची वेळ आली आहे, पर्यटकांवरच हल्ला झाला नाही तर दुश्मनांनी देशाच्या आत्म्यावर हल्ला केला आहे. ज्यांनी हा हल्ला केला आहे, त्या दहशतवाद्यांना आणि हल्ल्याचे षडयंत्र रचणाऱ्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा दिली जाईल. आता दहशतवाद्यांना मातीत घालण्याची वेळ आली आहे. १४० कोटी भारतीयांची इच्छाशक्ती आतंकीच्या आकांची कंबर तोडल्याशिवाय राहणार नाही, असे त्यांनी निक्षून सांगितले.

## छत्तीसगड-तेलंगणा सीमेवर
## ७ नक्षल्यांचा खात्मा

### हजारो सैनिकांचा परिसराला वेढा

■ **वृत्तसंस्था, जगदलपूर, दि. २४ :**
छत्तीसगड आणि तेलंगणा राज्यांच्या सीमेवर पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली आहे. दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात ७ नक्षलवादी ठार झाल्याचे वृत्त आहे. तेलंगणा, महाराष्ट्र आणि छत्तीसगड या तीन राज्यांमधील हजारो सैनिक या ऑपरेशनमध्ये आहेत.

सैनिकांनी हिडमा, दामोदर, देवा आणि त्यांच्या बटालियनसह अनेक मोठ्या नेत्यांना करेगट्टा, नाडपल्ली, पुजारी कांकेर या टेकडीवर वेढले आहे. येथे ३०० हून अधिक नक्षलवादी असल्याची माहिती आहे. हे ऑपरेशन ३ दिवसांहून अधिक काळ चालू आहे. सैनिकांसाठी रसद हेलिकॉप्टरद्वारे पोहोचवली जात आहे. हे ऑपरेशन सुमारे एक आठवडा चालेल असा अंदाज आहे.

## श्रीनगरमधून दुसरे विशेष विमान मुंबईत दाखल

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ :**
काश्मीर येथे अडकलेले महाराष्ट्रातील पर्यटक टप्प्याटप्प्याने महाराष्ट्रात दाखल होत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातर्फे विशेष विमानांची सोय करण्यात आली आहे. यातील विमानाची दुसरी फेरी मुंबईत दाखल झाली आहे.

काश्मीर येथे अडकलेले महाराष्ट्रातील पर्यटक श्रीनगरहून विशेष विमानाने मुंबईला रात्री ९:३० वाजता आले. या सर्व पर्यटकांना मुंबईतून त्यांच्या गावी जाण्यासाठी एसटी महामंडळाच्या शिवनेरी बसेस तेथे सज्ज ठेवलेल्या आहेत.

पहलगाव येथे दहशतवादी हल्ल्यानंतर राज्यातील अनेक पर्यटक अडकून पडले होते. या पर्यटकांना सुखरूप मुंबईत घेऊन येणारे पहिले विमान काल पहाटे साडे तीन वाजता



मुंबईत उतरले. तर आज दुपारी दोन वाजता उर्वरित पर्यटकांना घेऊन जाणारे दुसरे विमानही मुंबईकडे मार्गस्थ झाले.

या विमानातून १८४ पर्यटक मुंबईत आलेते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः त्यांच्याशी संवाद साधून त्याना आश्वस्त करून मुंबईकडे रवाना केले. यावेळी या पर्यटकांनी आवर्जून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. तत्पूर्वी शिंदे यांनी या पर्यटकांना त्यांच्या हॉटेल्समधून विमानतळाकडे रवाना केले. त्यांनी पर्यटकांसोबत फोटोसेशनही केले.

## एससी, एसटी मुलांच्या
## शाळेत रॅगिंग

■ **अहिल्यानगर, दि. २४ :**
जामखेड येथील अनुसूचित जाती-जमाती, नवबौद्ध मुलांच्या निवासी शाळेत मोठ्या विद्यार्थ्यांकडून लहान मुलांची रॅगिंग होत असल्याची घटना समोर आली आहे.

ऑल इंडिया पँथर सेनेचे नेते दीपक केदार यांनी एका व्हिडिओ पोस्टद्वारे ही घटना उजेडात आणली असून, कारवाईची मागणी केली आहे.

## मुख्यमंत्र्यांकडून हल्ल्यातील जखमींची विचारपूस

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी दुपारी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ पर्यटकांसह २७ पर्यटक मारले गेले. या हल्ल्यात २० जण जखमी झाले आहेत.

जखमींवर लष्करी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज हल्ल्यात जखमी झालेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांनी फोनवरून संवाद साधत त्यांची विचारपूस केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील जखमींसोबत संवाद साधत त्यांची विचारपूस केली. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे लष्करी रुग्णालयात महाराष्ट्रातील उपचार घेत असलेल्या पर्यटकांना भेटण्यासाठी गेले होते.

त्यावेळी त्यांच्या फोनवरून मुख्यमंत्र्यांनी संपर्क साधत आढावा घेतला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी जखमी पर्यटकांवर उपचार करणाऱ्या डॉक्टर्सचे सुद्धा आभार मानले.

तुमचे चांगले कर्म आणि ईश्वराची कृपा आहे. त्यामुळे तुम्ही वाचलात. काही काळजी करू नका सगळे ठीक होईल. आम्ही सगळे तुमच्या पाठिशी आहोत, असा दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जखमींना दिला.

## पूर्व प्राथमिक शिक्षण केंद्राची नोंदणी बंधनकारक : शासन निर्देश जारी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
तीन ते सहा वर्ष वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या राज्यातील खासगी शिक्षण केंद्रांना त्यांची नोंदणी बंधनकारक करण्यात आले आहे.

या केंद्रांना त्यांची सर्वसाधारण माहिती, व्यवस्थापन, विद्यार्थी संख्या, केंद्रात उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या माहितीची नोंद प्री स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टलवर करायची आहे. त्यासाठी या संस्थांना सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने गुरुवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या आकृतीबंधातील पहिली पाच वर्ष म्हणजे पूर्व प्राथमिक शाळेची तीन वर्ष (वयोगट ३ ते ६) तसेच इयत्ता पहिली आणि दुसरी (६ ते ८ वर्ष) यांचा समावेश आहे. या पाच वर्षाच्या टप्प्याला पायाभूत सुविधा स्तर म्हणून संबोधण्यात आले आहे. सध्या ३ ते ६ वर्ष वयोगातील बालकांना अंगणवाड्या, बालवाड्या तसेच शाळेला जोडून असलेल्या पूर्व प्राथमिक वर्ग आणि खासगी पूर्व प्राथमिक वर्गातून शिक्षण दिले जाते.

शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अंगणवाड्या, बालवाड्या यांची नोंदणी महिला आणि बालविकास विभागाकडे आहे.मात्र, खासगी पूर्व प्राथमिक वर्गांची माहिती राज्य सरकारकडे उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना शिक्षण देणाऱ्या पूर्व प्राथमिक शिक्षण केंद्राची नोंदणी बंधनकारक करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

## पोलीस आणि पुढाऱ्यांच्या छत्रछायेखाली

# उपराजधानीत छम् छम् छम्!

### खुलेआम डान्स बार सुरू : व्यावसायीकाला बेदम मारहाण

■ **विशेष प्रतिनिधी**
**महासागर, नागपूर, दि. २४ :**
सरकार दप्तरी बंदी असली तरी नागपूर शहराच्या काही भागात खुलेआम डान्स बार सुरू असून, काही राजकीय पुढारी तसेच पोलिसांच्या कृपादृष्टीने येथे सर्रास छम् छम् चा आवाज गुंजतो आहे. या डान्स बारमध्ये एका मुलीवर नोटा उधळण्यातून झालेल्या वादात एका व्यावसायिकाला बेदम मारहाण करण्यात आल्याचा प्रकार शुक्रवारी मध्यरात्री घडला. पोलिसांच्या रेकॉर्डवर मात्र या घटनेची नोंद नाही.

नागपूर शहराच्या दिघोरी पोलीस स्टेशन अंतर्गत एका बारचे रूपांतर डान्स बारमध्ये करण्यात आले असून, तेथे राजरोसपणे मुलींना नाचवले जात आहे. या डान्सबारमध्ये नियमीत जाणाऱ्या काही ग्राहकांच्या आग्रहाखातर हा डान्सबार अनेकदा दुपारी देखील सुरू असतो.



सदर डान्सबारमध्ये मुंबई, दिल्ली आणि इतर काही शहरातून नृत्यांगणा तरूणी आणल्या जात असून, रात्री ९ नंतर येथे कित्येक आंबटशौकिनांची मोठीच गर्दी असते. एक राजकीय पुढारी आणि पोलिसांचा वरदहस्त तसेच काही गुंडांचे कवच पांघरूण डान्सबार मालक खुलेआम हा धंदा करतो आहे.

दरम्यान, नजिकच्या एका शहरातील एक व्यापारी शुक्रवार १८ एप्रिलच्या रात्री येथे नृत्यांगणा तरूणीवर नोटा उधळत होता. त्याचवेळी १० ते १२ तरूणांचे टोळकेही याच तरूणीवर पैसे उधळत होते. व्यापारी नेहमीचा ग्राहक असल्याने तरूणी त्या टोळक्यांना भाव देत नव्हती. यामुळे ईगो दुखावलेल्या गुंडांच्या टोळीने त्या व्यापाऱ्याला रात्री १ च्या दरम्यान बेदम मारहाण केली. या टोळक्याला राजकीय आश्रय असल्याचेही बोलले जाते.


बार मालक आणि बाऊन्सर्सने बचाव केल्याने तो व्यापारी वाचला. डान्सबारची घटना असल्याने प्रकरण पोलिसांपर्यंत गेले नाही. गृहमंत्र्यांच्या शहरातच हा प्रकार सुरू असल्याने याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## जनतेला फक्त एक तास द्या

■ **महासागर प्रतिनिधी, वाशिम, दि.२४ :**
पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या विरोधात हिंगोलीत आमदार संतोष बांगर यांनी आंदोलन केले.

यावेळी बांगर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आवाहन करत 'पाकिस्तानला धडा शिवण्यासाठी भारताच्या जनतेला एक तास द्या', असे म्हणत हल्ल्याच्या घटनेचा निषेध केला आहे. पाकला धडा शिकवावा लागेल आणि त्यासाठी फक्त १ तास द्या, असे आवाहन त्यांनी केले.

आ. बांगर यांचे पीएम मोदींना आवाहन



## आश्वासन समितीच्या प्रमुखपदी आ. प्रविण दरेकर यांची नियुक्ती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२४ :**
महाराष्ट्र विधानपरिषद २०२४-२५ या वर्षासाठी विधिमंडळाच्या विविध समित्यांसाठी सदस्यांची नामनियुक्ती आश्वासन समितीच्या प्रमुखपदी भारतीय जनता पक्षाचे (भाजपा) विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

समितीत आ. चित्रा वाघ, आ. धर्मगुरू राठोड, आ. कृपाल तुमाने, आ. विक्रम काळे, आ. अभिजीत वंजारी, आ. मिलिंद नार्वेकर, आ. अरुण लाड यांचा समावेश आहे.

## इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयाबाहेर गोंधळ

### पाकिस्तान शिमलासह सर्व द्विपक्षीय करार रद्द करू शकतो

■ **वृत्तसंस्था, इस्लामाबाद, दि. २४ :**
पहलगाम हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या कठोर निर्णयांना प्रत्युत्तर म्हणून, पाकिस्तानने दोन्ही देशांमधील सर्व द्विपक्षीय करार स्थगित करण्याची चर्चा केली आहे. यामध्ये १९७२ च्या शिमला कराराचाही समावेश आहे. आज झालेल्या राष्ट्रीय सुरक्षा समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीनंतर काही वेळातच, पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद मधील भारतीय उच्चायुक्तालयाबाहेर जमावाने गोंधळ घातला, काही लोकांनी गेटवरून उडी मारण्याचा प्रयत्न केला आणि भारतविरोधी घोषणा दिल्या. पाकिस्तानने भारतीय उच्चायुक्तालया बाहेरील सुरक्षा जाणूनबुजून काढून टाकल्याचा आरोप केला जात आहे.

पाकिस्तानमधील राष्ट्रीय सुरक्षा समितीची बैठक पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. एक दिवस आधी, भारताने सिंधू पाणी करार पुढे ढकलण्यासह ५ मोठे निर्णय घेतले होते.

जर भारताने सिंधू पाणी करार थांबवला तर तो ॲक्ट ऑफ वॉर म्हणजेच युद्धाचा गुन्हा मानला जाईल, असे पाकिस्तानने म्हटले आहे. पाकिस्तानच्या सार्वभौमत्वाला आणि सुरक्षेला येणाऱ्या कोणत्याही धोक्याला सर्व प्रदेशात जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल, असे पाकिस्तानने म्हटले आहे. आम्ही कोणत्याही दहशतवादी कारवायांचा निषेध करतो.

पाकिस्तानी वृत्तपत्र 'डॉन'च्या वृत्तानुसार, वक्फ विधेयक भारतात जबरदस्तीने मंजूर करण्यात आले आहे, हा मुस्लिमांना बाजूला ठेवण्याचा प्रयत्न आहे.

## पाकिस्तानमध्ये घुसून मारा, मात्र दहशतवाद्यांचा विषय संपवा



**मुंबई, दि. २४ :** दहशतवादाला धर्म नसतो, मात्र काही लोक याला जातीयवादी रंग देण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. सरकारला पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवाद्यांना मारायचे असेल तर त्यांनी मारावे. सर्वांचा सरकारला पाठिंबा असल्याचेही रोहित पवार यांनी म्हटले आहे. या संदर्भात रोहित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सरकारला कडक कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भात रोहित पवार म्हणाले की, पाकिस्तानमध्ये तुम्हाला घुसायचे असेल तर घुसून मारा. मात्र या सर्व दहशतवाद्यांचा विषय कायमस्वरूपी संपवायला हवा. मात्र काही लोक धार्मिक विषय घेऊन पुढे घेऊन जात आहेत. मदत करणारे देखील मुस्लिम होते, हे विसरता येणार आहे. यामध्ये धार्मिक विषय न धरता, दहशतवादाला जात आणि धर्म नसतो, हे लक्षात ठेवावे. सरकारने दहशतवाद्यांच्या विरोधात कोणताही निर्णय घेतला तरी सर्व पक्ष आणि सर्व लोक या सरकार-सोबतराहतील, असे देखील आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

## मनसेने आयोजित केली काश्मीरची सहल



**मुंबई, दि. २४ :** पहलगाम हल्ल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये जाणाऱ्या पर्यटकांची संख्या रोडावली असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने काश्मीरची सहल आयोजित केली आहे. मनसे नेते संदीप देशपांडे यांनी ही सहल आयोजित केली आहे. काश्मीर भारताचा अविभाज्य अंग आहे. आम्ही तिथे जाण्यास घाबरत नाही. पर्यटकांना भारतात कुठेही जाण्याची भिती वाटू नये असा संदेश आम्हाला या प्रकरणी द्यायचा आहे, असे ते म्हणालेत. पहलगाम अतिरेकी हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला आहे. यात महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचा समावेश आहे. या घटनेमुळे जम्मू काश्मीरच्या पर्यटन उद्योगाला मोठा फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर मनसेने काश्मीरची सहल आयोजित केली आहे. मनसेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे या प्रकरणी बोलताना म्हणाले की, पहलगाम हल्ल्यामुळे काश्मीरच्या नियोजित सहली रद्द करण्याचे प्रमाण वाढले आहे. पर्यटन हा काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. त्यामुळे मनसेने ही गोष्ट लक्षात घेऊन काश्मीर सहल आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या लोकांची काश्मीरला जाण्याची इच्छा आहे, त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा. काश्मीर सहलीची सुरुवात आम्ही आमच्यापासून करत आहोत. काश्मीर भारताचा अविभाज्य घटक आहे. तिथे जायला आम्ही घाबरत नाही. पर्यटकांना भारतात कुठेही जाताना भिती वाटता कामा नये. हाच संदेश आम्हाला यातून द्यायचा आहे.

## अहिल्यानगरचे ४ तर धुळ्याचे २ तृतीयपंथी श्रीनगरमध्ये अडकले



**मुंबई, दि. २४ :** अहिल्यानगरचे चार तर धुळ्याचे दोन असे ६ तृतीयपंथी श्रीनगरमध्ये अडकले आहेत. त्यांना प्रवासासाठी तिकीट मिळत नसल्याची त्यांनी तक्रार केली आहे. त्यामुळे या तृतीयपंथीयांनी शासनाकडून मदतीची मागणी केली आहे. हल्ल्यामुळे काश्मीरमध्ये अनेक पर्यटक अडकले आहेत. त्यांना परत आणण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. त्यात आता सहा तृतीयपंथी देखील तेथे अडकले असल्याचे समोर आले आहे. आम्ही जम्मू-काश्मीरच्याश्रीनगर येथे अडकलेलो असल्याचे या तृतीयपंथीयांनी एका व्हिडिओच्या माध्यमातून सांगितले. पहलगाम येथे हल्ला झाल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. येथून बाहेर निघण्यासाठी रस्ता मार्ग बंद असून विमानाचे तिकीट देखील भेटत नसल्याचे या तृतीयपंथीयांनी एका व्हिडिओमध्ये सांगितले आहे. आमच्या सोबत काजल गुरु देखील आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने आम्हाला मदत करावी, अशी मागणी देखील या तृतीयपंथीयांनी केली आहे.

**वैयक्तिक कामासाठी जम्मूकाश्मीरला आल्याची माहिती**

आम्ही अहमदनगर येथील रहिवासी असून आमचे आमदार संग्राम जगताप यांनी आम्हाला मदत करावी. तसेच राज्य सरकारने आम्हाला येथून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी या तृतीयपंथीयांच्या वतीने करण्यात आली आहे. आम्ही आमच्या एका वैयक्तिक कामासाठी जम्मू-काश्मीरला आलो होतो. असे देखील त्यांनी सांगितले आहे. यामध्ये चार तृतीयपंथी हे अहमदनगर जिल्ह्यातील असून दोन तृतीयपंथी हे धुळे जिल्ह्यातील असल्याची माहिती यामध्ये देण्यात आली आहे.

## पहलगाम हल्ल्याचा मुंबई हायकोर्टाकडून निषेध

**मुंबई, दि. २४ :** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दुपारी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या दहशतवादी हल्ल्याबाबत सर्व स्तरातून निषेध करण्यात येत आहे. आज मुंबई उच्च न्यायालयाकडूनही पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. न्यायालयातील कामकाज सुरू करण्यापूर्वी २ मिनिटे मौन बाळगून मृतांना आदरांजली वाहण्यात आली. दुसरीकडे या हल्ल्याच्या निषेधार्थ ठाकरे गटाकडून मुंबईतील शिवसेना भवनसमोर आंदोलन करण्यात आले.आज मुंबई उच्च न्यायालयातील कोर्ट रूम क्रमांक ४६ मध्ये सकाळी १०:३० वाजता मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठासमोर उपस्थित सर्वांनी उभे राहत पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या निष्पाप पर्यटकांच्या स्मृतीप्रित्यर्थ २ मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहिली

## पीएम मोदींचे भाषण निव्वळ वल्गना

### सुषमा अंधारेंची टीका

■ महासागर प्रतिनिधी,

**पुणे, दि. २४ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पहलगाम हल्ल्या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सडकून टीका केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आजचे भाषण निव्वळ वल्गना असल्यासारखे होते. सरकारने अतिरेक्यांना पुलवामा हल्ल्यावेळीच धडा शिकवला असता तर आज ही वेळ आली नसती, असे त्या म्हणाल्यात.जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी अतिरेक्यांनी पर्यटकांवर भीषण हल्ला केला. त्यात महाराष्ट्रातील ६ पर्यटकांसह एकूण २६ जण मारले गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज बिहार येथील एका सभेत बोलताना या हल्ल्यावर भाष्य केले. तसेच अतिरेक्यांना कोणत्याही किंमतीत सोडणार नसल्याचा संकल्प व्यक्त केला. पहलगाम



हल्ल्यामुळे अवघा देश दुःखी झाला आहे. या हल्ल्यात कुणी आपला मुलगा, कुणी भाव तर कुणी आपला जोडीदार गमावला आहे. त्यातील प्रत्येकजण वेगवेगळे भाषिक होते. पण या सर्वांचे दुःख व आक्रोश एकसारखाच आहे. हल्ला हल्ला केवळ पर्यटकांवरच झाला नाही तर शत्रूंनी भारताच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे धाडस केले आहे. मी स्पष्ट शब्दांत सांगतो की, ज्यांनी हा हल्ला केला व ज्यांनी या हल्ल्याचा कट रचला, त्यांना त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी कठोर शिक्षा दिली जाईल.

# परवानगीशिवाय ऑफीस सोडल्यास शिस्तभंगाची कारवाई

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाने खळबळ

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २४ :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पूर्व परवानगीशिवाय कार्यालय सोडणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर निलंबनासह शिस्तभंगात्मक कारवाई करण्याची सूचना केली. यामुळे सरकारी बाबूंमध्ये एकच खळबळ माजली आहे. सरकारी काम आणि त्याला लागणारा वेळ हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. सरकारी काम अन्‌ महिनाभर थांब ही म्हण आपल्या व्यवस्थेतील ढिलाई आणि नोकरशाहीच्या जटिलतेचे प्रतीक मानले जाते. सरकारी कार्यालयात एखादे काम करायचे म्हणजे कागदपत्रांची जुळवाजुळव, अधिकाऱ्यांच्या बैठका, आणि नियमांचे पालन यातच बराच वेळ निघून जातो. सामान्य माणसाला या प्रक्रियेचा मोठा त्रास होतो. सरकार डिजिटलायझेशन आणि ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून काही सुधारणा करत आहे. पण तरीही वरील म्हणीचा वारंवार प्रत्येय येत राहतो. या पार्श्वभूमीवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपरोक्त आदेश दिले आहेत. महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांतील तहसीलदार ते निवड श्रेणीतील अप्पर जिल्हाधिकारी, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक



नियंत्रक तसेच जमाबंदी आयुक्त व संचालक (भूमी अभिलेख) यांच्या अधिनस्थ काही अधिकारी वारंवार विनापरवानगी मुख्यालयात गैरहजर राहत असल्याची तक्रार करण्यात आली होती. या प्रकरणी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आलेल्या तक्रारींची पडताळणी केली असता त्यात तथ्य आढळले. त्यानंतर बावनकुळे यांनी संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर निलंबनासह शिस्तभंगात्मक कारवाई करण्याचे निर्देश दिले.

**अधिकारी, कर्मचाऱ्यांची खैर नाही**

यासंबंधीच्या माहितीनुसार, चंद्रशेखर बावनकुळे यांनी पूर्वपरवानगीशिवाय कार्यालय सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांचे थेट निलंबन करण्याचे आदेश दिलेत. विशेषतः जनसेवेत कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही यासंबंधी निलंबनासह शिस्तभंगात्मक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बावनकुळे यांच्या या आदेशांमुळे महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचारी वर्गात एकच खळबळ माजली आहे.

**मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक**

अधिकारी व कर्मचारी शासकीय सुट्ट्या किंवा शासकीय दौऱ्यावर असतील तर त्यांची गैरहजरी मान्य करण्यात येईल. मात्र, इतर वेळी मुख्यालयात उपस्थित राहणे परिपत्रकातून बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. वरिष्ठांच्या अखत्यारीतील कोणताही अधिकारी पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडणार नाही. असे आढळून आल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल.

ही कारवाई शिस्त, कार्यक्षमता व लोकाभिमुख प्रशासन अबाधित ठेवण्यासाठी अत्यावश्यक असल्याचेही या प्रकरणी स्पष्ट करण्यात आले आहे.

## डीजीसीएच्या पत्रानंतर भाडेवाढ मागे, चार अतिरिक्त विमानांचीही सोय

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २४ :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी विमान कंपन्यांनी संकटात संधी शोधण्याचा प्रयत्न केला. एरवी सरासरी ८ ते १५ हजारांपर्यंत असलेले श्रीनगर ते मुंबई विमान तिकीट बुधवारी तब्बल हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात आले. या भाडेवाढीबद्दल नागरिकांनी सोशल मीडियात नाराजी व्यक्त करताच डीजीसीएने पत्र काढून सर्व विमान कंपन्यांना भाडेवाढ न करण्याचे आदेश दिले. त्यानंतर सायंकाळी चारच्या सुमारास कंपन्यांनी नियमित दरानेच तिकीट बुकिंग सुरू केले. श्रीनगरमधून मुंबईकडे येणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने काही खासगी विमान कंपन्यांची २३, २४, २५ आणि २६ एप्रिल रोजीची सर्व तिकिटे बुक झालेली आहेत. दहशतवादी हल्ल्यानंतर बहुतांश पर्यटकांनी पुढील पर्यटन सोडून तातडीने



आपापल्या गावी परतण्याचे नियोजन केले. त्यामुळे विमानसेवेवरही ताण आला. अचानक श्रीनगर ते मुंबई बुकिंगसाठी पर्यटकांच्या उड्या पडू लागताच विमान कंपन्यांनीही अव्वाच्या सव्वा भाडेवाढ केली. दुपारपर्यंत विमान कंपन्यांच्या अधिकृत संकेतस्थळांवर सरासरी ४० ते ५० हजार रुपयांपर्यंतचे प्रतिप्रवासी तिकीट दर होते. एका कंपनीने तर तब्बल ५५ हजार रुपये दर केला.

याबाबत नागरिकांनी सोशल मीडियावर संताप व्यक्त करायला सुरुवात केली. त्यानंतर डीजीसीएने सर्व विमान कंपन्यांसाठी एक पत्र जारी करत काही सूचना केल्या. त्यामध्ये भाडेवाढ करू नये, तसेच तिकीट रद्द किंवा रिशेड्युलिंगसाठी शुल्क आकारू नये, विमानांची उड्डाणे वाढवावीत, असे या पत्रामध्ये म्हटले. त्यानंतर विमान कंपन्या ताळ्यावर आल्या व भाडेवाढ मागे घेतली.

### मुंबईहून काश्मीरसाठी साडेचार हजार भाडे

हल्ल्यानंतर काश्मीरला जाणाऱ्यांची संख्या घटली तर तिकडून मुंबईत येणाऱ्यांची प्रचंड वाढली. त्यामुळे आपसूकच विमान कंपन्यांनी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी मुंबईतून श्रीनगरला जाण्यासाठी केवळ साडेचार हजार रुपयांपासून तिकीट दर ठेवले होते. याउलट श्रीनगरहून मुंबईला येण्यासाठी ६ ते १८ हजार रुपयांपर्यंतचे दर होते.



## मुंबई आणि नाशिकमध्ये ठाकरे गटाची निदर्शने

**मुंबई, दि. २४ :** नाशिकमध्ये ठाकरे गटाच्या वतीने पाकिस्तानचा झेंडा जाळून पहलगामधील हल्ल्याचा निषेध करण्यात आला. दुसरीकडे, पहलगाममधील हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष चांगलाच आक्रमक झाला आहे. ठाकरे गटाकडून आंदोलन केले जात आहे. मुंबईतील शिवसेना भवन आणि नाशिकमध्ये पक्ष कार्यालयासमोर आंदोलन केले जात आहे. यावेळी पाकिस्तान मुर्दाबादची घोषणाबाजी करण्यात आली. तर नाशिकमध्ये शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून पाकिस्तानचा झेंडा जाळत पहलगाममधील हल्ल्याचा निषेध वर्तवण्यात आला आहे.

# मेंढपाळ कुटुंबातील मुलगा बनला अधिकारी

### बिरदेव ढोणे याचा प्रेरणादायी प्रवास

■ महासागर प्रतिनिधी,

**कोल्हापूर , दि. २४ :** कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील यमगे या लहानशा गावातील बिरदेव सिद्धाप्पा ढोणे याने आपल्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आयपीएस अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे. यूपीएससी २०२४ च्या परीक्षेत त्यांनी ५५१वा क्रमांक मिळवून यश संपादन केले. विशेष म्हणजे, तो आपल्या तालुक्यातील पहिला अधिकारी असून एका मेंढपाळ कुटुंबातून आला आहे. कठोर मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कुठलेही शिखर गाठता येते, हे बिरदेव ढोणे याने दाखवून दिले. प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तर संधीचे सोने करून यश प्राप्त करू शकता, असे बिरदेव म्हणाला

बिरदेव याचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्याच्या घरी वीज नव्हती, अभ्यासासाठी शाळेच्या व्हरांड्याचा आसरा होता. वडील मेंढपाळ, आई गृहिणी अशा पार्श्वभूमीतून आलेल्या या युवकाला शिक्षण घेताना अनेक अडथळे आले पण त्याने कधी हार मानली नाही. बिरदेव हा पहिल्यापासून अभ्यासात हुशार होता. दहावीत ९६% गुण मिळवून मुरगूड केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला आणि बारावीत ८९% गुणांसह विज्ञान शाखेत यश मिळवले. पुढे त्याने पुण्याच्या प्रतिष्ठित कॉलेजमधून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेतली.

**दोनदा हुलकावणी, तिसऱ्या प्रयत्नात यशाला गवसणी**

यूपीएससीच्या परीक्षेसाठी त्याने दिल्लीमध्ये दोन वर्षे अभ्यास केला. पहिल्या दोन प्रयत्नांमध्ये यशाने त्याला हुलकावणी दिली. पण या अपयशाने खचून न जाता त्याने जिद्दीने मागील वर्षी पुन्हा परीक्षा दिली आणि तिसऱ्या प्रयत्नात ५५१ वा क्रमांक मिळवून आयपीएस पदाला गवसणी घातली. बिरदेवच्या यशाने केवळ त्यांच्या कुटुंबालाच नव्हे, तर संपूर्ण गावाला अभिमान वाटतो आहे.

**निकाल लागला तेव्हा मेंढरे चारण्यात व्यस्त होता बिरदेव**

यूपीएससीचा निकाल २२ एप्रिल रोजी जाहीर झाला. निकाल समोर आला त्यावेळी बिरदेव आपल्या आईवडीलांसोबत बेळगाव परिसरात मेंढरे चारण्यामध्ये व्यस्त होता. दिल्लीतील सहकारी मित्रांनी फोनद्वारे बिरदेव ढोणे याला तो आयपीएस अधिकारी झाल्याची आनंदाची बातमी दिली. यावेळी ढोणे कुटुंबीयांच्या आनंदाला पारावर उरला नाही. या यशाबद्दल बिरदेवचा पारंपारिक फेटा बांधून तसेच हार घालून सत्कार करण्यात आला.

**बकरी राखण्याच्या कष्टापेक्षा अभ्यास सोपा वाटत होता**

यूपीएससीतील यशाबद्दल बोलताना बिरदेव म्हणाला, यूपीएससी परीक्षेत देशातून ५५१ वा रँक मिळाला. हे यश प्राप्त केल्यानंतर खूप भारी वाटतंय. प्रयत्न, जिद्द आणि चिकाटी असेल, तर आपणही यशाला गवसणी घालू शकतो. मेंढपाळाचा मुलगा असल्याने अभ्यास करताना थोडा त्रास झाला, पण जिद्द, चिकाटी आणि अभ्यासाबद्दलची ओढ असल्यामुळे अभ्यास आवडत होता. बकरी राखण्याच्या कष्टापेक्षा अभ्यास सोपा वाटत होता. तेच माझ्यासाठी



मोटिवेशन होते. अभ्यास नाही केला, तर आपल्याला पारंपारिक मेंढी आणि शेळी पालन करावे लागेल. हीच माझी यूपीएससी सिव्हिल सर्व्हिसच्या तयारीसाठी प्रेरणा होती.

बिरदेव पुढे म्हणाला की, बकरी आणि मेंढ्या राखणे आता सोपे राहिले नाही, खूप अवघड झाले आहे. गडी मिळत नाहीत, शेतकरीही शेताच्या बांधाला येऊ देत नाहीत, त्यामुळे मेंढपाळ व्यवसाय करणे कठीण झाले आहे. त्यामुळे चांगली नोकरी मिळवून आयुष्यात स्थैर्य मिळवणे महत्त्वाचे असल्याचे वाटत होते. मेंढपाळ व्यवसायात अस्थिरता आहे, त्यापेक्षा मी स्थिरतेला प्राधान्य दिले. जी यूपीएससी मला देणार होती. अभ्यास केल्यानंतर आपण आपल्या कुटुंबाची परिस्थिती बदलू शकत होतो. या विचाराने मला अभ्यासासाठी प्रेरणा मिळत गेली.

**तुम्ही गरिबीत मेलात, तर तो तुमचा दोष**

यूपीएससीचा निकाल आल्यानंतर मला धक्का बसला. चांगला रँक मिळवून एका मेंढपाळाचा मुलगा आयपीएस अधिकारी बनू शकतो. हे खूप भारी वाटत होते. मुलांना सांगण्याचा उद्देश हाच आहे की, स्वतःवर कितीही वाईट परिस्थिती आली, पण तुमच्याकडे जिद्द, चिकाटी आणि समर्पणाची भावना असेल, तर तुम्ही तुमच्या परिस्थितीवर मात करून चांगली नोकरी मिळवू शकता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एक कोट आहे, 'तुम्ही गरिबीत जन्मला, हा तुमचा दोष नाही. पण गरिबीत मेलात, हा तुमचा दोष आहे' प्रयत्नांची पराकष्ठा केली, तर संधीचे सोने करून यश प्राप्त करू शकतात. माझ्यासारखा मेंढपाळाचा मुलगा करू शकतो, तर तुम्हीही करू शकतात. गावाकडच्या मुलांनी कोणत्याही गोष्टीला घाबरून न जाता, आपले प्रयत्न आणि चिकाटी ठेवली तर सगळ्या गोष्टी साध्य करणे सोपे आहे, असा संदेश बिरदेव याने तरुणांना दिला.

युपीएससीची मुलाखत दिल्यानंतर ज्ञानप्रबोधिनी येथील अभ्यास केंद्रावरुन जात असताना रात्री ११ वाजता राधिका भेळ येथून माझा फोन चोरीला गेला. माझा फोन चोरीला गेला ही गोष्ट मी अद्यापही घरी सांगितली नाही. माझा फोन बंद पडला, असे मी घरच्यांना सांगितले. पण खरं तर माझा फोन चोरीला गेलाय. त्यामुळे, आजही माझ्या बीडच्या मित्राचा फोन मी वापरत आहे, असे बिरदेवने सांगितले. तसेच, फोन चोरीला गेल्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला गेलो, तेव्हा त्यांनी आम्हाला भावच नाही दिला, माझी तक्रारही घेतली नाही, असे बिरदेवने एका मुलाखतीत बोलताना सांगितले. ज्या पोलिसांनी बिरदेवची तक्रार घेतली नाही, तो बिरदेव आता आयपीएस अधिकारी बनला आहे.

## संकटाच्या काळात आम्ही सरकारच्या पाठीशी:संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी,

**मुंबई, दि. २४ :** देशावरील असलेल्या या संकटाच्या काळात आम्ही केंद्र सरकारच्या पाठीशी असल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. जो काही निर्णय घ्यायचा तो सरकारच घेत असते. मात्र आम्ही त्यांच्या पाठीशी असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. सर्व पक्षीय बैठकीत देखील हाच सूर असतो. मात्र, या काळात विरोधी पक्षाने दिलेल्या सूचनांचे पालन देखील सरकारने करावे, असे आवाहन संजय राऊत यांनी केले आहे. देशात इतर अनेक विषयांवर एक किंवा दोन दिवसांवर अधिवेशन बोलावले जाते. त्याच पद्धतीने काश्मीरच्या प्रश्नावर देखील दोन दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावायला हरकत नाही, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामध्ये विरोधकांच्या सूचना किंवा एकंदरीत राष्ट्राची भावना त्यावर चर्चा घडवून देशाच्या सर्वच पक्ष्यांच्या नेत्यांना त्या ठिकाणी बोलण्याची संधी मिळायला हवी, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. काश्मीर आणि मणिपूर हे अत्यंत धगधगते प्रश्न आहेत. या प्रश्नावर आम्हाला बोलू दिले पाहिजे. संविधानावरील अधिवेशनातील चर्चे दरम्यान काश्मीरवर बोलण्यास फार कमी वेळ मिळाला. या विषयावर हिंदू - मुसलमान राजकारण करण्याचा प्रयत्न काही लोकांनी केला. मात्र तो यशस्वी झाला नाही. त्याबद्दल देशवासीयांचे आभार मानायला हवे. मात्र या सर्व विषयावर संसदेमध्ये चर्चा झाली तर त्यामुळे सरकारला चांगली दिशा मिळेल, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. राष्ट्र म्हणून आमच्या



भावना आणि संवेदना या सरकार सोबत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने सर्व पक्षीय बैठकीला कोण जाणार? याचा निर्णय अद्याप झालेला नसल्याची माहिती त्यांनी दिली. अरविंद सावंत हे एका मीटिंगसाठी बाहेर गेलेले आहेत. मात्र मी अशा मिटिंगला जात नाही. मी फार आक्रमक बोलतो. त्यामुळे मी अशा बैठकांना जाणे टाळतो. मात्र, आमचा प्रतिनिधी नक्कीच उपस्थित राहील. एक राष्ट्र म्हणून आमच्या भावना आणि संवेदना या सरकार सोबत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

**इंदिरा गांधी यांची आठवण येते**

या प्रसंगी आम्हाला इंदिरा गांधी यांनी आठवण येत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. १९७१ मध्ये ज्या पद्धतीने त्यांनी प्रसंग हाताळला आणि पाकिस्तानचे दोन तुकडे केले. यातून त्यांनी पाकिस्तानला कायमची अद्दल घडवली. त्यामुळे आता आम्हाला इंदिरा गांधींची आठवण येत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. यातून सरकारवर दुबळेपणाचा आरोप करत आहात का? असा प्रश्नही त्यांना विचारण्यात आला होता. यावर सरकार जर दुबळे असेल तर त्यांच्या पाठीशी उभे राहुल आम्ही त्यांना ताकद देऊ, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. हा हल्ला केवळ काश्मीर किंवा पर्यटकांवर नाही तर हा देशावरील हल्ला असल्याचेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## सुंदर जीवसृष्टी: पृथ्वी व मनुष्याची कवचकुंडले!

मानवाला सुखाने जगायचे व आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला व पृथ्वीला तिच्या महाविनाशापासून वाचविता आले पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. वसुंधरा किंवा पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरण संवर्धन जागृती करण्यासाठी जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५०. अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी संपातबिंदू होतो, तोच पृथ्वी दिन पाळतात.

इ.स. २००४ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली. पृथ्वी हा सूर्यमालेतील सूयार्पासूनच्या अंतरानुक्रमे तिसरा तर आकारानुक्रमे पाचवा ग्रह आहे. सूर्यमालेतील खडकाळ ग्रहांमध्ये हा सर्वांत मोठा आहे. पृथ्वीला निळाग्रह असेही म्हणतात. जिथे जीवन आहे, अशी पूर्ण विश्वात ही एकमेव ज्ञात जागा आहे. पृथ्वीची निर्मिती साधारणपणे ४५७ कोटी वर्षांपूर्वी झालीअसावी. तिचा उपग्रह चंद्र साधारणपणे ४५३ कोटी वर्षांपूवीर्पासून तिला प्रदक्षिणा घालू लागला. हिचा व्यास १२,७५६, किमी एवढा आहे. सूयार्पासून तिचे अंतर साधारणपणे १४,४५,८४०,,, किमी एवढे आहे. पृथ्वीला स्वत:भोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास २४ तास लागतात. तसेच सूयार्भोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास ३६७ दिवस लागतात. या ३६५ दिवसांच्या कालावधीला आपण एक वर्ष म्हणतो. पृथ्वी तिच्या स्वत:भोवती फिरण्याच्या आसापासून २३.५. अंशांनी कललेली आहे. याच स्थितीत ती स्वत:भोवती व सूयार्भोवती प्रदक्षिणा पूर्ण करते, म्हणूनच पृथ्वीवर उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे ऋतुचक्र सुरू असते. मानवाला सुखाने जगायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. पृथ्वीवर सूयार्चा प्रकाश पोहचण्यासाठी साधारणत: ८ मिनिटे २० सेकंद लागतात. पृथ्वी सूयार्भोवती लंबवतुर्ळाकार मागार्ने प्रदक्षिणा पूर्ण करते. या प्रदक्षिणेमध्ये थोडाजरी फरक पडला असता, तर पृथ्वीवर कदाचित जीवसृष्टी निर्माण झाली नसती. पृथ्वीची रचना, गुरुत्वाकर्षण, सूयार्पासूनचे ठराविक अंतर आणि पृथ्वीवर असलेले वातावरण यामुळेच तिच्यावर जीवसृष्टी निर्माण झाली असावी, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. पृथ्वीशिवाय इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी नाही. पृथ्वी स्वत: चुंबक असल्याने पृथ्वीभोवती चुंबकिय क्षेत्र आहे, या चुंबकीय क्षेत्रमुळे सूयार्पासून येणारे हानीकारक किरण पृथ्वीच्या धृवीय क्षेत्राकडे वळतात. पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर भौगोलिक आणि जैविक प्रक्रियांनी तिच्यात खूप परिवर्तन झाले आहे. पृथ्वी आपल्या अक्षाभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. ती तळाच्या उंचीचा हिस्टोग्राम तिच्या तळावर पाण्याची विपुलता एक अद्भुत वैशिष्ट्य आहे, जे सौर मंडळाच्या अन्य ग्रहांपासून या निळ्या ग्रहाला वेगळे करते.

पृथ्वीच्या जलमंडळात मुख्यत: महासागर आहे, परंतु तांत्रिक रूपाने दुनियेत उपस्थित इतर पाण्याचे स्रोत जसे-अंतर्देशीय समुद्र, तलाव, नदी आणि दोन हजार मीटर खोल भूमिगत पाण्यासहित यात सामावले आहे. पाण्यातील सर्वात खोल जागा १०,४११.४,. मीटर खोल प्रशांत महासागरमध्ये मारियाना ट्रेंचची चैलेंजर डीप आहे. कॅनडा मधील रॉकी पर्वत मोराइन लेकला दुर्लक्षित करतो. जीवन टिकवून ठेवणारा एक ग्रह म्हणजे जगणे अस्तित्वात नसले, तरीसुद्धा राहण्यायोग्य असे म्हटले जाते. पृथ्वी द्रव पाणी पुरवते स्क वातावरण जेथे जटिल सेंद्रिय अणू एकत्र येऊन संवाद साधू शकतात आणि चयापचय प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी ऊर्जा देऊ शकतात. माणूस चंद्रावर जाऊन तेथे वास्तव्य करण्याची भाषा वल्गना करत आहे, मात्र त्याला या साध्या पृथ्वीवर धड चालता येत नाही. त्याच्या अशा बेजबाबदार चालण्या-वागण्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले, तर पृथ्वीचा महाविनाश अटळ आहे. म्हणून मानवजातीचा तळपट थांबविण्यासाठी मानवाने सावध वागलेच पाहिजे, हीच त्याची पूज्य बुद्धी ठरेल!

**संकलन वसुलेखन**
**कृष्णकुमार आनंदीगोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली.**
७७७५०४१०८६ .

# कुठवर शांत बसणार?

पंचनामा
■ मनोज बागडे




**पर्यटकांना वाचविण्यासाठी सैय्यद हुसैन आतंकवाद्यांशी भिडला. रायफल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला आणि आतंकवाद्यांच्या गोळीबारात जीव गमावला .**



पहलगाम येथील दहशतवादी हल्ला हादरवून सोडणारा आहे . या घटनेने प्रत्येक भारतीय पेटून उठला आहे, संताप धुमसतो आहे, पुरे झाली सहनशिलता, आता सूड उगवलाच पाहिजे, घरात घुसून मारायला हवे म्हणून भावना व्यक्त होत आहेत . आतंकवाद्यांनी निष्पाप २७ पर्यटकांना गोळ्या घालून ठार मारले.

या पर्यटकांचा भाजपा आणि त्यांच्या एनडीए सरकारशी संबंध नव्हता, कलम ३७० सोबत संबंध नव्हता, वक्फ बोर्डाशी त्यांचे घेणे देणे नव्हते. तरीही त्यांना जीव गमवावा लागला . गोळ्या झाडणाऱ्यांच्या संघटनेने याची जबाबदारी घेतली. पण, आमच्या सरकारचेही काही उत्तरदायित्व नाही का? पुलवामा घडल्यानंतर आम्ही बालाकोट स्ट्राईक केले . यावेळी आमचे निष्पाप नागरिक मारले गेलेत . आता कारवाई करायची नाही तर केंव्हा करणार? कुठवर अशी गांडुगिरी पोसत बसणार आहोत आम्ही?

आतंकवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्याचे सांगितले जाते . घटनास्थळी उपस्थित असलेल्या आणि प्रचंड भेदरलेल्या पर्यटकांनी आपबिती सांगितली, ती खरीच असावी . परंतु, समाज माध्यमांमध्ये नंतर ज्या पोस्ट आल्या, राजकारण्यांनी ज्या पद्धतीने गवगवा केला, त्यात काही बाबी प्रकर्षाने दडवून ठेवल्या गेल्या.

पहलगाममधल्या बैसरन इथं अतिरेकी पोहोचले. पर्यटकांना धर्म विचारु लागले तेव्हा त्यांना एका स्थानिक घोडेस्वाराने विरोध केला. घोडेस्वारीसाठी तो पर्यटकांना तिथं घेऊन आला होता. यांचा धर्म कोणताही असेल; पण हे सर्वजण निष्पाप आहेत. काश्मीरचे पाहुणे आहेत. कोणावरही गोळी झाडू नका, अशी विनंती त्याने केली. अतिरेक्यांनी त्याचं ऐकलं नाही.

या घोडेस्वाराने एका अतिरेक्याच्या हातातली एके ४७ रायफल हिसकावून घेतली. तोवर दुसऱ्याने त्याच्यावर हल्ला केला. धरपकड झाली आणि या घोडेस्वाराला गोळी लागली. रक्तबंबाळ झालेल्या या घोडेस्वाराला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं पण तोवर या घोडेस्वाराचा मृत्यू झाला होता. या घोडेस्वाराच्या विरोधामुळे अनेकांचे प्राण वाचले, असं पर्यटकांनी सांगितलं. सैय्यद हुसैन शाह असे या घोडेस्वाराचे नाव .घरात कमावणारा एकुलता एक पोरगा. तो अतिरेक्यांशी लढताना मृत्यूमुखी पडला.

धर्माच्या नावावर कुणी कितीही वणवा पेटवला तरी जसे धर्मांध विकृत अतिरेकी असतात तसेच त्या धर्मांधतेच्या विरोधात उभी राहणारी सैय्यदसारखी लढाऊ बाण्याची माणसंही असतात. या सैय्यदला एक सॅल्युट तर बनतोच.

पहलगामच्या घटनेतून कितीतरी प्रश्नांना जन्म दिला आहे . प्रधानमंत्री मोदी यांचा यापूर्वीचा दौरा रद्द होण्यापासून ते त्या भागात सुरक्षा व्यवस्था नसण्यापर्यंत . काही महिन्यांपूर्वी मोदी यांचा या भागातील दौरा आतंकी हल्ल्याच्या शक्यतेवरून रद्द करण्यात आला होता .आता हजारो पर्यटक त्या भागात जातात, आणि आतंकी हल्ला होवू शकतो, हे गृहित धरून पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा जवान तैनात का केले नव्हते? हल्ला झालेले ठिकाण हे काश्मीर बॉर्डरवर नसून इथून जवळपास साडेतीनशे किलोमीटर आहे या ठिकाणी पोहोचण्यासाठी किमान आठ तास प्रवास करावा लागतो. मग अतिरेकी पहेलगाम पर्यंत पोहोचले कसे? अतिरेक्यांकडून गोळीबारानंतर अर्धा तास उलटलातरी घटनास्थळी सुरक्षा रक्षक का पोहोचू शकले नाहीत? पहलगाम हत्यानंतर केवळ धर्म विचारून गोळ्या झाडण्यात आल्या, ही माहिती जशी झपाट्याने व्हायरल केली गेली, तशीच सुरक्षा व्यवस्थेतील गलथानपणा बाबतची उत्तरेही सरकारने तातडीने द्यावीत. केवळ धार्मिक कटुता ठेवून राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न केला जाऊ नये.

गुप्तचर खात्यांना पुसटशी सुद्धा कल्पना का नव्हती? हे गुप्तचर खात्याचे अपयश मानायचे का? श्रेय घ्यायच्यावेळी पुढे असणारे नेते यावेळी स्वतःचे फेल्यूअर कबूल करतील का?

डॉ. मनमोहन सिंग देशाचे प्रधानमंत्री असताना नरेंद्र मोदी यांना त्यांना काही प्रश्न विचारले होते, सीमा सुरक्षा तुमच्या हातात असताना, आतंकवादी घुसतातच कसे? त्यांना शस्त्रांचा पुरवठा कसा होतो? त्यांना फंडिंग कशी काय केली जाते? आता मोदी प्रधानमंत्री आहेत आणि आतंकवादी हल्लेही सुरूच आहेत. त्यात निष्पाप भारतीयांचे जीव जाताहेत .त्याच प्रश्नांची उत्तरे आता प्रधानमंत्र्यांनी देण्याची वेळ आली आहे.

यात कुणावर टीका करण्याचा हेतू नाही, अशा कठीण प्रसंगी संपूर्ण देशवासी आणि विरोधी पक्ष देखील सरकारच्या सोबत आहेत . परंतु, देशातील सर्वसामान्य नागरिकांचे जीव स्वस्त आहेत, मरतात तर मरू द्या... हे धोरण यापुढे चालणार नाही . खड्डयात घाला तुमचे राजकारण. निष्पाप लोकांचे जीव घेणाऱ्यांना त्यांच्या घरात घुसून ठेचायला हवे. ■ ■ ■

पतीच्या कलेवराजवळ बसलेली ती...
तिचं डोकं थोडंसं वाकलेलं...
डोळे सुन्न.. अश्रूंना थांबवण्याचाही
प्रयत्न नाही... जणू तिच्या काळजात
कोणी खोलवर छिन्न केलेलं...
हे दृश्य पाहून मन तुटून पडलं...
ती काही बोलत नव्हती.. पण तिचं मौन
कधीच ऐकलेलं नव्हतं इतकं बोलत
होतं.
त्या मौनात..पतीच्या हरवलेल्या
हास्याचा आवाज होता,
एकत्र घेतलेली शेवटची छायाचित्रं...
आणि 'आपण दोघं सुट्टीवर आलोय' हे
निरागस स्वप्न... सगळं त्या क्षणात
काळाच्या तोंडात गेलं होतं...
त्या रक्ताच्या थारोळ्यात तिचा संसार
विखुरला होता...
तो फक्त नवरा नव्हता... तो तिचं
खांद्यावर टेकणारं बळ होता....
त्याच्या मिठीत ती विसावणारी एक
संपूर्ण दुनिया होती....
आता तो निष्प्राण... आणि ती...
एकट्यानं जिवंतपणे मृत्यू सहन
करणारी!
हे दुःख केवळ तिचं नाही...ते
माणुसकीचं होतं... प्रेमाचं
होतं...विश्वासाचं होतं...
ती बसली होती... पण उठवणं शक्य
नव्हतं.... कारण ती आता फक्त
शरीरानं होती... मनानं, काळजानं,
आत्म्यानं... ती त्या मरणातच
विरघळली होती...
हे दृश्य केवळ बघण्याचं नव्हतं...
ते अंतर्मनाने भोगायचं होतं...
शब्द हतबल झाले... आणि मन शून्य.
त्या नजरेत, त्या थरारात,
एक संपलेलं आयुष्य आणि एक न
संपणारा शोक कायमचा कोरला गेला.

---

# दौलत

(कालच्या अंकावरून पुढे)

---------------

'उचापतखोर' ही कथा काळू बाळू साळू माळू हे चार मित्र अस्सल दारूडे,उदारी बुडविणारी, चांगल्या कामात अडसर ठरणारे, गावात पत नाही लोकांचे त्यांना मत नाही अशीही इरसाल जोडी गावातील उच्चशिक्षित सरपंचांना त्रास देणे त्याची बदमानी करणे. प्रत्येक गावात दारूपुरते पैसे काढणारी ही टोळी खेडेगावात हौदास घालते, याचे प्रत्ययकारी चित्रण या कथेत आले आहे.

'शबनम'ही स्त्रीप्रधान कथा आहे. शबनम ही मुस्लिम अनाथ मुलगी तिचे पालनपोषण यशोधरा आणि मिलिंद या जोडप्यांनी करून तिला नृत्यांगना बनवलं. 'शबनम' ही आईवडिलांची आधार आहे. ती कोरोनाच्या काळात वडील मिलिंदला वाचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करते. नृत्याची कला सादर करताना शबनम चक्कर येऊन पडते. तिला तिचि मैत्रीण नयना दवाखान्यात ॲडमिट करते. तिच्या पायाचे ऑपरेशन होते. तिच्या पायाची शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर ती घरी येते. तेव्हा यशोधरा नयनाला म्हणते माज्या काळजाच्या घडाला वाचवलीस म्हणून कृतज्ञभावना व्यक्त करते. रक्ताच्या नात्यापेक्षा ही मानलेले नाते कसे श्रेष्ठ असतात याची जाणीव करून देणारी ही महत्त्वाची कथा आहे.

'झुंजार पत्रकार' या कथेत पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा खांब मानली जाते. जे वृत्तपत्र किंवा पत्रकार विचारांनी तत्वाने पत्रकारिता करतात त्यांना आज समाजात मान सन्मान प्रतिष्ठा आहे. जे वृत्तपत्र किंवा पत्रकार हे पैशापुढे लाचार झाले आहेत, पत्रकारिता म्हणजे जगण्याचे साधन मानतात, अशा जग्यामुळेच पत्रकारिता बदनाम झालेली आहे हे प्रखर वास्तव निर्भिडपणे कथेत लेखकांनी मांडले आहे हे विशेष होय.

'सृजनोत्सव' ही कथा साकुर्ली खेडेगावातून नागपूरात कामासाठी स्थायिक झालेल्या नथूबा, कमलाबाई या कामगार दाम्पत्यांनी आपला मुलगा संजय बाबासाहेबांसारखा शिकून मोठा व्हावा ही त्यांची उत्कट इच्छा असते. संजू हा जिद्दी चिवट मिळेल ते काम करुन कुटुंब पोसणे आणि कविता लिहून कुसुमाग्रज, यशवंत मनोहर,केशव मेश्राम या कवीश्रेष्ठासारखं नाव कमविणे ही बाब त्याने काळजावर कोरून घेतली होती. खांद्यावर गॅस सिलिंडर आणि मस्तकात कविता असणाऱ्या कवीचे भावविश्व या कथेत लेखकांनी अचूकपणे टिपले आहे.

'उड्डाण' ही कथा वेधक वास्तववादी आहे. गणेशभाई पत्रकारांची मुलगी प्रतिक्षा प्रचंड आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर विश्वसुंदरी होते. विश्वसुंदरी होण्यासाठी श्रीमंतच असावे लागते असे नसते तर त्यासाठी प्रयत्न करायला हवे. यश मिळत गेले की,लोकांचे सहकार्यही मिळत असते. डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन शिक्षण घेतलेल्या माणसाचं, समाजाच्या आयुष्याचं सोनं होते. प्रगतीची उड्डाण घेतल्याशिवाय प्रतिष्ठेचा सन्मान मिळत नाही. गरीबी, दारिद्रयामुळे खचून न जाता त्यातूनही आत्मविश्वासाने परिश्रम केल्यास यश हमखास मिळू शकते हा संदेश ही कथा नवीन पिढीला देते हेच तिचे वेगळेपण आहे.

'झुंज' ही कथा एका बुध्दीमान गरीबी, नियतीवर मात करून वैद्यकीय अधिकारी होणाऱ्या शबनमची यशोगाथा आहे. या संग्रहातील कथा प्रचंड आशावादी, प्रेरणादायी नवीन पिढीला शिक्षण घ्यायला, जीवन जगायला बळ देणाऱ्या आहेत. साहित्य शेवटी माणसाचं हित आणि गीत गाते हे कार्य जगत्पुरिया यांच्या कथा प्रामाणिकपणे करताहेत हे विशेष होय.

'गिरजा' ही हृदयद्रावक कथा आहे. .रक्ताच्या नात्यापेक्षा जपलेली मानलेली नातीच खरी असतात याची जाणीव करून देणारी ही कथा आहे.

'ऐनुर आपा' ही एका मुस्लिम स्त्रीचे भावविश्व साकार करणारी कथा आहे. पती निधनानंतर नेटाने संसार करून मुलाला शिक्षण शिकविते. त्याला पाटबंधारे विभागात नोकरी लागते. त्याच्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्यामुळे शब्बीरची नोकरी जाते. झुंजार पत्रकार सत्यान्वेषी वृत्तपत्रात स्तंभलेखन करून न्याय मिळवून देतो आणि पुन्हा पुर्ववत शब्बीरला नोकरीवर घेतले जाते. पत्रकारितेची ताकद किती असते याची जाणीव करून देणारी ही कथा आहे.

----(क्रमशः)----

**डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
**उदगीर. ९९२२९६६५२६**

■ ■ ■

---

# मुर्शिदाबाद दंगलीचा अन्वयार्थ!


अभय गोखले

११ एप्रिलला पश्चिम बंगाल मधील मुर्शिदाबाद येथे झालेल्या दंगलीचे पडसाद देशभर उमटत आहेत.वक्फ कायद्याच्या विरोधात मुस्लिम समाजाने आयोजित केलेल्या आंदोलनाने उग्र रूप धारण केले आणि त्यानंतर झालेल्या हिंसाचारात हिंदू समाजातील दोघांची हत्या करण्यात आली. हरगोविंद दास आणि त्यांचे सुपुत्र चंदन दास या बापलेकांना, त्यांनी कोणताही अपराध केलेला नसताना निर्घृणपणे ठार मारण्यात आले

मुर्शिदाबाद हा मुस्लिमबहुल जिल्हा आहे. हा जिल्हा बांगलादेशच्या सीमेला लागून असल्याने तेथे गेली अनेक वर्षे सातत्याने घुसखोरी होत आहे. १९७७ ते २०११ हा प्रदिर्घ काळ पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीने बांगलादेश मधून होणाऱ्या घुसखोरीला उत्तेजन देऊन,त्या घुसखोरांना आपली व्होट बँक बनवले.

त्यानंतर २०११ मध्ये डाव्या आघाडीचा पराभव करून पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर आलेल्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी डाव्या आघाडीची री ओढली आणि बांगलादेशी घुसखोरांना, घुसखोरी करण्यास उत्तेजन दिले. या मुस्लिम व्होट बँकेच्या जोरावर ममता बॅनर्जी यांनी २०१६ आणि २०२१ च्या विधानसभा निवडणुका प्रचंड बहुमताने जिंकल्या.

या घुसखोरांना आधार कार्ड, इलेक्शन कार्ड, रेशनकार्ड विनासायास मिळाल्याने त्यांची घुसखोरी कमालीची वाढली. मुर्शिदाबाद जिल्ह्यात झालेल्या या घुसखोरीमुळे आता हा जिल्हा मुस्लिम बहुल झाला आहे.

अर्थात पश्चिम बंगाल मधील हा एकमेव मुस्लिम बहुल जिल्हा नाही, ही गोष्ट या ठिकाणी प्रकर्षाने लक्षात घ्यायला हवी. ममता बॅनर्जी यांनी मुस्लिम व्होट बँकेच्या जोरावर या जिल्ह्यावर मजबूत पकड मिळवली आहे.

ममतांच्या मुस्लिम धार्जिण्या धोरणामुळे या भागात घुसखोरांची दादागिरी वाढली असून, हिंदुंना सतत भितीच्या छायेखाली वावरावे लागत आहे. जो पर्यंत ममता बॅनर्जी या पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर आहेत, तोपर्यंत तेथील हिंदूंना भितीच्या छायेखाली वावरावे लागणार आहे.

पश्चिम बंगाल मध्ये मुस्लिम समाजाची लोकसंख्या साधारणतः ३० ते ३३ टक्के इतकी आहे.१९४७ पासून आजतागायत वेळोवेळी पूर्व बंगाल आणि आताचा बांगलादेश यामधून पश्चिम बंगाल मध्ये सातत्याने झालेल्या घुसखोरीमुळे, पश्चिम बंगालमधील लोकसंख्येचे संतुलन बिघडले असून, मुस्लिम समाजाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.

वक्फ कायद्याच्या विरोधातील आंदोलन हे एक निमित्त होते. हा कायदा पश्चिम बंगाल मध्ये लागू केला जाणार नाही,हे ममता बॅनर्जी यांनी जाहीर केल्यानंतरही त्या विरोधात हिंसक आंदोलन करण्याची गरजच काय होती.

महत्वाची गोष्ट म्हणजे हिंदूंवर हल्ला कशासाठी करण्यात आला? याचे उत्तर सरळ आहे ते म्हणजे हिंदूंवर हल्ला करण्यासाठी त्यांना काहीतरी निमित्त हवे होते.अशा प्रसंगी पश्चिम बंगालमधील पोलिस हे बघ्याची भूमिका घेत असल्याने हल्लेखोरांचे चांगलेच फावते.

मुर्शिदाबाद येथील हिंसाचारात हिंदूंची घरे जाळण्यात आली,त्यांची दुकाने लुटण्यात आली, अखेर भयभीत झालेल्या हिंदूंना तेथून पलायन करून, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागला.त्या पलायन केलेल्या हिंदूंपैकी काही जणांची त्या बाबतीतील प्रतिक्रिया पुरेशी बोलकी होती.त्यांनी सांगितले की आमच्याच देशात आम्ही निर्वासित झालो आहोत, आता तक्रार कुणाकडे करणार, असा त्यांच्या बोलण्याचा अर्थ होता.

त्यातील काहींनी तर आपल्या घरी पुन्हा परतण्यास नकार दिला, त्यांनी अशी भीती व्यक्त केली की आम्ही घरी परतलो तर ते पुन्हा आमच्यावर हल्ला करतील.त्यांचा पोलिसांवर विश्वास राहिलेला नाही.त्यांनी अशी मागणी केली की, ते रहात असलेल्या विभागात सीमा सुरक्षा दलाला कायमचे तैनात करण्यात यावे.

इकडे ममता बॅनर्जी यांना आपल्या व्होट बँकेची काळजी लागून राहिली आहे,कारण पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत.त्या या सर्व प्रकरणाचे राजकारण करत आहेत.त्यांनी मुर्शिदाबाद येथील दंगलीला भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. थोडक्यात सांगायचे तर त्या दंगलीत निरपराध हिंदूंचे जे नुकसान झाले, त्याच्याशी ममतांना काही देणे घेणे नाही, असेच त्यांच्या निरनिराळ्या वक्तव्यांवरून दिसून येत आहे.

बांगलादेशमध्ये सातत्याने हिंदूंवर हल्ले होत आहेत, त्याबद्दल भारतातील हिंदूंना काळजी वाटणे, स्वाभाविकच आहे. परंतु पश्चिम बंगाल तर भारतातच आहे, त्या पश्चिम बंगालमध्ये असलेल्या मुर्शिदाबाद येथील हिंदूंना जिहादींच्या दहशतीमुळे आपले घर सोडून दुसरीकडे पलायन करावे लागत असेल तर त्याहून लज्जास्पद असे काहीच नसेल.

■ ■ ■

---

# वेध लागले सुट्टीचे

*मुलांना वेध लागले सुट्टीचे*
*मामाच्या गावाला जाण्याचे*
*मौज मज्जा मस्ती करण्याचे*
*मामाला त्रासून सोडण्याचे*

शाळेत जाणाऱ्या मुलांना सतत वाटतं असते कीं सुट्टीचा दिवस म्हणजे रविवार लवकर यावं, हा सर्वात जास्त बऱ्याच मुलांना आवडणारा दिवस, सुट्टीच्या दिवशी मुलांना खूप मज्जा मस्ती करावी वाटत असते. बऱ्याच मुलांच्या शाळा या सकाळी असतात. त्यामुळे मुलांना सकाळी लवकर उठाव लागते, मुलांची शाळेत जायची इच्छा जरी नसली तरीही आई जबरदस्तीने मुलांची तयारी करून शाळेला पाठवते. मुलांची पूर्ण झोप होवो किंवा नाही, तेच मुलं केव्हा रविवार येते, याची सतत मुलं वाट बघतात.

सुट्टीचा आनंद मुलं घेत असतात आणि सोमवार आला की तेच मग दप्तराच ओझं पाठीवर,तोच अभ्यास, मुलांना अशा वेळी नेहमी समजून सांगावं लागते, शिक्षण खूप महत्त्वाचे आहे, शिक्षणाने माणूस मोठा होतो, पण मुलांचं काही नाही त्यांना फक्त कसतरी शाळेला जाऊन, भरभर लिहून, पाठांतर करून अभ्यास संपवायचा असतो.

वर्षाच्या शेवटी वार्षिक पेपर येतात, तेव्हा मात्र मुलं या दरम्यान खूप आंनदात दिसतात. परीक्षेनंतर मामाच्या, मावशीच्या गावाला जायची लगबग सुरू होते . माहेरी गेल्यानंतर आई मुलांना बघून स्वतःचे बालपण आठवत असते, मुलं मामा बरोबर, मावशी बरोबर, आजी आजोबांन बरोबर खेळतात, मस्ती करतात. मामा श्रीमंत असो किंवा नसो पण मामा हा मामाच.

भाच्यांना हवं नको ते घेवून देतो, हट्ट पुरवतो. मुलंही मामाच्या खांद्यावर बसून सुट्ट्यांचा आनंद घेतात, कधी आंबे, कधी खरबूज तर कधी टरबूज. मामा मुलांना शेतात घेऊन जातो, शेतामध्ये मोठ झाड असते, झोके घ्यायला मामा त्या झाडाला दोर बांधून देतो आणि त्यावर मुलांना झोके घ्यायला सांगतो, प्रत्येक दिवशी वेगवेगळे खेळ ठरलेले असतात, मामा मुलांबरोबर वेगवेगळे खेळ खेळतो.

मुलांना मामाच्या गावाला गेल्यानंतर जसा आनंद वाटतो, तसाच मुलांच्या आईला सुद्धा वाटत असतो, माहेरी आल्यानंतर आईलाही थोडं कामापासून आराम मिळतो, काही दिवस का होईना पण मुलांबरोबर तिलाही आईच्या कडे म्हणजे माहेरी करमते. शाळेच्या सुट्यांचे एक एक दिवस खूप आनंदाने एन्जॉय करत धमाल करत निघून जातात, आणि पुन्हा मग मुलांना वेध लागते सुटीचे...

*शाळेच्या सुट्ट्यांचा वेध*
*मुलांना लागतो जेव्हा*
*मुलांना सतत वाटते*
*सुट्ट्या लागतात केव्हा*

----------------

**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**9834583685**

■ ■ ■

---

## समाजाला आध्यात्मिक ऊर्जा देणारी संस्था!

साधारण ५-६ वर्षा पूर्वी मी एका मंदिरात सनातन संस्थेच्या ग्रंथ प्रदर्शन कक्षाला भेट दिली होती. त्यावेळी संस्थेच्या पूजा सामग्रिसह संस्थेच्या ग्रंथ संपदेची माहिती मिळाली. त्यातील अगदी सोप्या शब्दात, सण, धार्मिक व्रते, देवलेला कोणती फूले वाहावी, कोणता नामजप करावा, धार्मिक कृतीमागील शास्त्र, स्त्रीयांनी अलंकार का घालावे, कुंकू का लावावे ओटी कशी भरावी या दररोज आणि नेहमी करणाऱ्या कृती आणि अशा अनेक विषयावरील लहान मोठे पुस्तक (ग्रंथ) मिळाले.

ते वाचून खरोखर खूप छान वाटले. कारण आज जेव्हा किती तरी मुली आणि महिला पाश्चिमात्य संस्कृतिचे अंधानुकरण करतांना दिसतात पण आपली भारतीय प्राचिन महान संस्कृति आणि सनातन धर्म का आणि काय सांगतो? ते आपण विसरत चाललो आहे. त्यामुळे अशी माहिती सांगणारी संस्था आणि त्यांची पुस्तके आपल्या सर्वांसाठीच खूप महत्वाची आहेत.

आज आपणच ह्यातून मिळालेल्या माहितीनुसार आचरण करून येणाऱ्या पिढिला लव जिहाद सारख्या विळख्यातून वाचवु शकतो. आज आपण आपला धर्म जोपासला आणि आचरणात आणला तरच त्याचे रक्षण होणार आहे. त्यामुळे आध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक विषयांचे ज्ञान त्यातून मिळते. समाजाला आध्यात्मिक ऊर्जा देणारी ही संस्था आहे, असे म्हणावे लागेल.

■ सौ. वर्षा आवदे
नागपूर.

वाचक लिहितात

## आम्ही फक्त धर्म विचारतो.. हिंदू.. मग गोळी खा...

ही एक ओळ पुरेशी आहे, एक सभ्य राष्ट्राच्या अंतरात्म्याला हादरण्यासाठी. जिथे मानवतेचा विजय व्हायला हवा, तिथे धर्माच्या आधारावर जीवनाचा निर्णय घेतला जात आहे, तीच खरी शोकांतिका आहे. पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात निष्पाप हिंदूवर गोळीबार झाला. रम्य, शांत परिसरात अस काही घडावं- हे केवळ त्रासदायक नाही, तर विचार करायला भाग पाडणारं आहे. हे फक्त एक माणसाचं हत्याकांड नव्हते, हा हल्ला होता विचारांवर, श्रद्धेवर, आणि एका संपूर्ण धर्मावर. आपण म्हणतो की, आतंकवाद्यांचा कोणताच धर्म नसतो. पण गोळी झाडण्यापूर्वी जर धर्म विचारला जात असेल, तर आपण डोळसपणे ही वाक्य किती वेळा उच्चारणार?

भारत हे विविधतेचं प्रतीक असलं तरी, आज हिंदू समाजच स्वतःच्या देशात असुरक्षित का वाटून घेतो? आज नवविवाहित जोडीदारांना आपला जोडीदार गमवावा लागला. हिंदू धर्मियांनाच का टारगेट करत आहे? ह्याचे कारण काय? तर भारतात त्यांचे बहुमत आहे. म्हणून धर्मवाद होतोय का? आपल्या धर्मावर प्रेम करणं, त्याचा अभिमान बाळगणे हा दोष नाही. उलट, जेव्हा आपल्या सभ्यतेला, श्रद्धेला अस्तित्वाला वारंवार आव्हान दिल्या जात आहे, तेव्हा धर्माभिमान ही आपली ढाल बनते. जात-पात, प्रांत, भाषेच्या भिंती झुगारून देण्याची हीच वेळ आहे. मी ब्राह्मण, मी मराठा, मी दक्षिण भारतीय, अस म्हणण्यापेक्षा मी हिंदू हे एकच ओळख बनवणे गरजेचे आहे.

जग काहीही बोलेल, पण आपण आपल्या धर्माचा अपमान, अत्याचार आणि निदोर्षांच्या हत्या यावर शांत राहणे हा गुन्हाच होईल. मुलांना धार्मिक शिकणासोबत, आत्मरक्षा, कायदेशीर माहिती देणे याचीही गरज आहे. तुमचा धर्म, तुमची संस्कृती, तुमची ओळख-हे सर्व तुमच्या हातात आहे. हिंदू म्हणून जर तुम्ही अभिमान बाळगत नसाल, तर उद्या तुमची किंमत विचारली जाणार नाही-धर्म विचारला जाणार!

धर्मांतर, लवजिहाद आणि विभाजनकारक शक्तींना प्रत्युत्तर देण्याची हीच ती वेळ आहे-विचाराने, शिक्षणाने आणि एकतेने आज वेळ आहे - फक्त श्रद्धा टिकवण्याची नाही तर हिंदू म्हणून संघटित होण्याची. आज हिंदू समाजच स्वतःच्या देशात असुरक्षित वाटून घेतो? सर्व धमार्ची शिकवण आपल्या मुलांना द्या पण कोणी आपल्या धर्मावर बोट उचलले आणि अत्याचार करत असेल तर बोट छाटायची ताकद, हिंमत आपल्यात असायला हवी. धर्माभिमान जागृत करणे ही काळाची गरज आहे. हिंदूंनो जातीने नाही, तर धर्माभिमानाने उठून उभे राहा!

■ राधा प्रमोद पिंपळापुरे, उमरेड.

---

# डाळिंब खाण्यासोबतच केसांना लावा... मिळतील आश्चर्यकारक फायदे...





प्रत्येक महिलेला तिचे केस लांब आणि रेशमी व्हावे असे वाटते. या काळात केस गळणे ही एक सामान्या समस्या झालेली आहे. या समस्येने अने त्रस्त आहेत. केसगळतीच्या समस्येवर मात करण्यासाठी महागडे प्रॉडक्ट वापरतात. पण त्यांचा फारसा फरक पडत नाही.

पातळ आणि गळून कमी झालेले केस यावर मात करण्यासाठी, केसांना मजबूत आणि सुंदर बनवण्यासाठी काही टिप्स आहेत . डाळिंब खाण्याचे फायदे आहेत. पण ते खाण्याव्यतिरिक्त तुम्ही केसांना देखील लावू शकता. डाळिंब हे केस सुंदर, रेशमी, मजबूत आणि लांब बनवण्याचा एक नैसर्गिक मार्ग आहे.

डाळिंब खाण्याव्यतिरिक्त डाळिंबाचे तेल किंवा मास्कद्वारे केसांना लावू शकता. डाळिंब हे एक सुपरफूड आहे जे जीवनसत्त्वे, अँटिऑक्सिडंट्स आणि फॅटी ॲसिडने समृद्ध आहे. केसांची काळजी घेण्यापासून ते एकूण आरोग्यापर्यंत, खूप फायदेशीर आहेत.

डाळिंबाचा रस तेलात मिक्स करून केसांना लावा. डाळिंबाच्या बियांचे तेल बाजारात उपलब्ध आहे. ज्यामध्ये प्युनिकिक ॲसिड आणि ओमेगा-५ फॅटी ॲसिडसारखे पोषक घटक असतात. ते तुमच्या टाळूमध्ये खोलवर मॉइश्चरायझेशन करते.

हे तेल दररोज केसांना लावा आणि मसाज करा. यामुळे तुमचे रक्ताभिसरण सुधारेल आणि तुमचे केसही मजबूत होतील. तसेच ज्यांचे केस खुप पातळ आहेत ते केसांना निरोगी देखील बनवते. डाळिंबाच्या बियांचे तेल लावण्यापूर्वी ते थोडेसे गरम करा. डाळिंबाचे तेल नसेल तर तुम्ही डाळिंबाचा रस तेलात मिक्स करून देखील ते लावू शकता. तासभर ठेवल्यानंतर केस शॅम्पूने धुवा.

**डाळिंबाचा हेअर मास्क**

खोल कंडिशनिंगसाठी घरी डाळिंबाचा हेअर मास्क बनवू केसांना लावू शकता. ताजे डाळिंबाचा रस घ्या आणि त्यात दही, मध योग्य प्रमाणात मिक्स करून त्यांची पेस्ट बनवा. ही पेस्ट केसांना व्यवस्थित लावा. ३० मिनिटे ठेवल्यानंतर कोमट पाण्याने धुवा. हा डाळिंबाचा हेअर मास्क केसांना हायड्रेट ठेवतो, तसेच केसांना चमक देतो आणि कुरळे केस मऊ आणि रेशमी बनवण्यास मदत करतो.

■ ■ ■

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### दे दणादण ..!

पाक भारताला
वारंवार डिवचतेय
आमचं सरकार कां बरं
कानाडोळा करतेय ..?

पाकच्या माकडचेष्टांनं
भारतमाता विचलीत
मोदीची द्या असा ठोसा
पाकन व्हावं चारीमुंड्या चित .

सौ सुनारकी एक लोहार की
अशीच करा गनिमी कृती
अठरा वेळा हल्ले करून
घेतलीय हिंदुंच्या
प्राणांची आहूती ..!

# २६-२७ एप्रिलला श्री साई बाबांच्या मूळ 'चर्म चरण पादुकां'चा दर्शन सोहळा

**नागपूर, २४ एप्रिल :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व श्री साईबाबा सेवा मंडळद्वारा संचालित श्री साई मंदिर, वर्धा रोड नागपूर यांच्या सहयोगाने श्री साईबाबांनी वापरलेल्या 'मूळ चर्म चरण पादुकां'चा दर्शन सोहळा शनिवार २६ व रविवार २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. विदर्भाची प्रतिशिर्डी असलेल्या नागपूर येथील वर्धारोड स्थित साई मंदिरात १९७६ साली मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्यादरम्यान प्रथमच आणि दुसऱ्यांदा १९७९ साली श्रीदत्तजयंतीच्या पर्वावर या दिव्य चर्म चरण पादुकांचे आगमन झाले होते. तिसऱ्यांदा श्री साईबाबांच्या पुण्यतिथीनिमित्त २०१८ साली पादुकांचा दर्शन सोहळा पार पडला. आता चौथ्यांदा या दिव्य पादुकांचे आगमन साई मंदिर संस्थानात होणार आहे. २६ व २७ एप्रिल २०२५ या दोन दिवशी या पादुकांचा भव्य दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. २६ एप्रिल रोजी दुपारी १२ च्या आरतीनंतर ते रात्री मंदिर बंद होईपर्यंत या पादुका भक्तांच्या दर्शनास ठेवण्यात येतील तर, २७ एप्रिलला पहाटे ५.३० ते रात्री मंदिर बंद होईपर्यंत भक्तांना या पादुकांच्या दुर्लभ दर्शनाचा लाभ मिळणार आहे. २६ एप्रिल शनिवार रोजी सकाळी ९.३० वाजता साईबाबांच्या या दिव्य चर्म पादुकांचे नागपूर विमानतळावर आगमन होणार असून १० वाजता सुरु होणाऱ्या भव्य पालखी मिरवणूकीच्या गाजावाजात पादुका साईमंदिरात आणण्यात येतील. पादुकांचे पाद्यपूजन व १२ वाजताची आरती झाल्यानंतर पादुका सर्वांकरिता दर्शनास ठेवण्यात येतील. पादुकांच्या आगमनाची मुहूर्तवेढ श्री साई मंदिर धंतोली व श्री साईबाबा सेवा मंडळाचे (वर्धा रोड) संस्थापक अध्यक्ष प.पू. श्री विजयबाबा कोन्ड्रा यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमाने रोवण्यात येईल.

या दिव्य चर्म चरण पादुकांच्या दर्शन सोहळ्याचे औचित्य साधत दोन दिवस सांस्कृतिक व संगीत कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे. शनिवार २६ एप्रिल रोजी आयोजित कार्यक्रमात सकाळी ९.३० वाजता महालक्ष्मी इव्हेंट ऑर्गनायझर, दुपारी १२ वाजता भस्मे ताई यांचे नवशक्ती महिला भजन मंडळ, ४.३० वाजता स्वररमणी श्रीमती विद्या बोरकर व सायंकाळी ७ वाजता राकेश भामरी प्रस्तुत साईराम स्वरसाधना ग्रुप यांचे संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. २७ एप्रिल रविवार रोजी सकाळी ९ वाजता हनुमान भजनी मंडळ अडयाळी, दुपारी १२.३० वाजता हर्षल जोंधळे प्रस्तुत हर्षल म्युजिकल ग्रुप, दुपारी ३ वाजता पुनीत कुशवाह प्रस्तुत जल्लोष बँड व सायंकाळी ७ वाजता महालक्ष्मी इव्हेंट ऑर्गनायझर यांचे संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. दोन्ही दिवशी मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम जसे कि काकड आरती, माध्यान्ह आरती आणि धूप आरती दररोजच्या वेळेनुसारच पार पडणार आहे. श्री साईबाबा सेवा मंडळ, श्री साई बाबा मंदिर(वर्धा रोड) नागपूरचे सचिव श्री अविनाश शेगावकर तसेच अध्यक्ष श्री ओमप्रकाश यादव व कोषाध्यक्ष राजेंद्र देशमुख यांनी सर्व साईबाबा भक्तांना आवाहन केले आहे की त्यांनी या दिव्य चर्म चरण पादुकांचे मोठ्या संख्येने दर्शन घ्यावे व दोन दिवसीय सोहळ्याचा लाभ घ्यावा. श्री साईबाबा सेवा मंडळ नागपूरचे विश्वस्त डॉ. रवींद्र भोयर, श्री प्रताप रणनवरे, श्री राजेंद्र दांडेकर, श्री घनश्यामदास राठी, श्री कैलाश जोगानी, श्री सुधीर दफ्तरी व श्री महेश टेंभरे यांनी या पादुका दर्शन सोहळ्याच्या भव्य तयारी केली असून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या तदर्थ समितीचे विशेष योगदान या आयोजनास लाभले आहे. तदर्थ समितीच्या अध्यक्षा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अहिल्यानगर-श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के), सदस्य-अहिल्यानगर जिल्हाधिकारी आयएएस डॉ. पंकज आशिया, सदस्य-अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयएएस श्री गोरक्ष गाडीलकर यांनी या पादुका सोहळ्याच्या आयोजनास विशेष सहकार्य केले. या दोन दिवसीय सोहळ्यानिमित्त आयोजित महाप्रसादास लागणारे अन्नधान्य जसे कि गहू, तांदूळ, डाळ, तेल, साखर तसेच इतर साहित्य व देणग्या श्री साईबाबा मंदिर(वर्धा रोड) येथील काउंटरवर स्वीकारण्यात येतील अशी माहिती मंदिर प्रशासनातर्फे देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी आपण मंदिराचा अधिकृत ई-मेल saibabasewamandal@gmail.com तसेच दूरध्वनी क्रमांक ०७१२-६६०६१६६/ ९३७२२५१६६५ वर संपर्क साधू शकता. चर्म चरण पादुका सोहळ्याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी व मंदिराच्या प्रत्येक कार्यक्रमाबाबत अपडेट मिळविण्यासाठी फेसबुक पेज Sai Mandir, Wardha Road, Nagpur ला फॉलो करा.

# सायबर फसवणुकीपासून ज्येष्ठांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र सायबर आणि जेनएस लाईफ यांची हातमिळवणी



**मुंबई, २४ एप्रिल :** जेनएस लाईफ ने ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य बनवण्याच्या वाढत चाललेल्या सायबर गुन्ह्यांविरुद्ध जागरूकता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र सायबरशी भागीदारी केली आहे. जेनएस लाईफ हे तुमच्या वयाच्या साठीच्या पुढच्या आयुष्यासाठी उपयुक्त असे एक ॲप आहे. वरिष्ठ नागरिकांना जीवनाचा परिपूर्ण अनुभव घेता यावा यासाठी त्यांना सक्षम बनवणारा हा एक टेक्नॉलॉजी-सक्षम आणि आकर्षक प्लॅटफॉर्म आहे.

महाराष्ट्र सायबरने नमूद केले आहे की सायबर गुन्ह्यांच्या दररोज ५००० तक्रारी नोंदल्या जातात. याचा अर्थ दर मिनिटाला ४ सायबर गुन्हे घडत आहेत. सध्या सगळ्यात जास्त आढळणारा घोटाळा म्हणजे डिजिटल अरेस्ट, ज्यामध्ये गुन्हेगार स्वतः कायदा अंमलबजावणी अधिकारी असल्याचे सांगून आणि कायदेशीर कार्यवाहीच्या धमक्या देऊन वृद्धांकडून पैसे उकळतात.

२०२४ मध्ये, फक्त महाराष्ट्रात ८,९४७ सायबर प्रकरणे नोंदण्यात आली आहेत. यावरून डिजिटल फसवणुकीच्या प्रकरणांचे वाढते प्रमाण दिसून येते. पुण्यात सर्वाधिक आर्थिक नुकसान रु. ६,७०७ कोटी रु. झाल्याची नोंद आहे. नागपुरात ६३.८५ कोटी रु. च्या फसवणुकीची २१२ प्रकरणे आहेत. मुंबईत सर्वाधिक ४८४९२ प्रकरणे नोंदण्यात आली आहेत.

महाराष्ट्र सायबरचे पोलीस महाउपनिरिक्षक संजय शिंत्रे यांनी जेनएस लाईफ सोबत बोलताना ज्येष्ठ नागरिक कसे फसवणुकीला सहज बळी पडू शकतात यावर प्रकाश टाकताना म्हटले, भारतात १५ कोटींपेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांचे डिजिटल ज्ञान मर्यादित असते आणि आर्थिक संपत्तीपर्यंत पोहोच असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांना सायबर गुन्ह्यांसाठी प्रामुख्याने लक्ष्य बनवले जाते. डिजिटल अरेस्टच्या बाबतीत नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवा की, कोणतेही सरकारी खाते किंवा पोलीस, विमानतळ, कस्टम्स, इन्कम टॅक्स, सीबीआय, क्राइम ब्रांच, सीआयडी, ईडी सारख्या कायदा अंमलबजावणी एजन्सी कधीही व्हिडिओ कॉल मार्फत चौकशी करत नाहीत.

महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या सक्रिय उपाययोजनांवर भर देत श्री. शिंत्रे म्हणाले, या वाढत चाललेल्या धोक्याचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने खास सायबर गुन्हे हाताळणारी केंद्रे स्थापित केली आहेत. ही भारतातील एक अशी व्यवस्था आहे, जेथे गुन्ह्याला बळी पडणारा माणूस आमच्या हेल्पलाइन नंबरमार्फत २४ तासात केव्हाही गुन्हा नोंदवू शकतो. या वाढत्या घोटाळ्यांविषयीचे मार्गदर्शन सतत प्रकाशित करून आम्ही नागरिकांना सतर्क राहण्याची विनंती करत आहोत. आम्ही एक समर्पित प्लॅटफॉर्म विकसित केला आहे, जेथे बळी पडलेली व्यक्ती तक्रार नोंदवून तत्काळ तपास सुरू करवू शकते.

या गुन्ह्यांचा सामना करताना काय करावे याबद्दल सल्ला देताना शिंत्रे म्हणाले, सायबर गुन्हेगार सतत आपल्या पद्धती बदलत आहेत. त्यामुळे जागरूकता ही बचावाची पहिली पायरी आहे. भारत सरकारने २६ लाखांपेक्षा जास्त बनावट मोबाइल नंबर ब्लॉक केले आहेत, जे सायबर गुन्ह्याविरुद्धच्या लढ्यातील एक लक्षणीय पाऊल आहे. ज्येष्ठ नागरिकांना अधिकृत मार्गदर्शिकांची माहिती असली पाहिजे, त्यांनी आपले मोबाइल सुरक्षित ठेवून डिजिटल स्वच्छता राखली पाहजे आणि अज्ञात कॉल आणि मेसेज तपासून घेतले पाहिजेत.

या वाढत्या धोक्याविषयी टिप्पणी करताना जेनएस लाईफ च्या संस्थापिका मीनाक्षी मेनन म्हणाल्या, आपल्या ज्येष्ठांना केवळ सहानुभूतीचीच नाही, तर चांगल्या आणि स्मार्ट सुरक्षेची देखील आवश्यकता आहे. जेनएस लाईफ मध्ये आम्ही विम्याची शिक्षण आणि मदतीशी सांगड घालून हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करत आहोत की, ज्येष्ठांना ऑनलाइन व्यवहार करताना सुरक्षित वाटेल आणि आत्मविश्वास वाटेल. आजच्या डिजिटल युगात परिपूर्ण जीवन जगण्यासाठी त्यांना सक्षम करण्याचा हा प्रयत्न आहे. आम्हाला वाटते की वयाच्या साठीनंतर आपल्या मर्जीने जीवन जगता यायला हवे.

ज्येष्ठांना सायबर धोक्यांचा वेळोवेळी सामना करावा लागतो, त्यावर उपाययोजना करताना जेनएस लाईफ ने खास आपल्या गोल्ड प्लानच्या सदस्यांसाठी सायबर इन्शुरन्स लॉन्च केला आहे, जो फसवणुकीमुळे होणारे नुकसान कव्हर करतो तसेच सोपी सुरक्षा मार्गदर्शिका, संवादात्मक जागरूकता सत्रे आणि २४ तास सेवा प्रदान करतो.

# एअरटेलने स्पॅम विरुद्ध लढाई सुरू ठेवताना नव्या वैशिष्ट्यांची घोषणा

**नागपूर, २४ एप्रिल :** एअरटेलने असे एआय द्वारा समर्थित स्पॅम शोधणारे साधन (डिटेक्शन टूल) लाँच केले आहे ज्याने आपल्या ग्राहकांना स्पॅम म्हणून २७.५ बिलियन कॉल्स चिन्हांकित करून दाखविले आहेत आणि या लाँच नंतर आज स्पॅमर्सच्या दोन पाऊले पुढे राहण्याच्या उद्देशाने दोन महत्त्वपूर्ण सुधारणा सादर करण्याची घोषणा केली आहे.

ग्राहकांना आता त्यांच्या पसंतीच्या भारतीय भाषांमध्ये कॉल्स आणि एस.एम.एस संदेशांसाठी स्पॅम अलर्ट्स मिळणार आहेत. हे नवे वैशिष्ट्य दहा स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध होणार आहेत आणि यामध्ये पुढे जाऊन आणखी भर घालण्याची योजना आखलेली आहे. एअरटेलचे एआय द्वारा समर्थित साधन आता ग्राहकांना आंतरराष्ट्रीय नेटवर्क वरून येणारे सर्व स्पॅम कॉल्स आणि एस.एम.एस शोधून काढून त्याची चेतवणी (अलर्ट) देणार आहे.

एअरटेल ने देशांतर्गत स्पॅम कॉल्सचा सामना करण्यासाठी आपले प्रयत्न तीव्र केले आणि त्यानंतर, घोटाळेबाज आणि स्पॅमर्स यांनी परदेशी नेटवर्कचा गैरवापर करून भारतात फसवे कॉल पाठविण्यास सुरुवात केली. या भीतीदायक प्रवृत्तीमुळे गेल्या सहा महिन्यांमध्ये परदेशी स्पॅम कॉल्सचे प्रमाण १२% ने वाढलेले आहे. नवे वैशिष्ट्ये सादर करून एअरटेल हे वाढते आव्हान निष्प्रभावी करण्याची अपेक्षा करत आहे.

या उपक्रमावर भाष्य करताना सिद्धार्थ शर्मा, डायरेक्टर मार्केटिंग आणि सी.ई.ओ कनेक्टेड होम्स, भारती एअरटेल म्हणाले, आम्ही करत असलेल्या गोष्टींच्या केंद्रस्थानी आम्ही ग्राहक आणि त्यांचा अभिप्राय ठेवतो. ग्राहकांच्या अभिप्रायाचे काळजीपूर्वक विश्लेषण केल्यानंतर, आम्ही आमच्या उपायांमध्ये सुधारणा केली आहे जेणेकरून भारतातील भाषिक विविधतेची अधिक चांगल्या प्रकारे सेवा करता येईल. याव्यतिरिक्त, स्पॅम रहदारीचे वाढते प्रमाण परदेशी नेटवर्कवर स्थलांतरित झाल्याने, आम्ही आमच्या एआय द्वारा समर्थित साधनाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे जेणेकरून आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून येणारे सर्व एस.एम.एस संदेश आणि फोन कॉल्स तपासता येतील. अभियंते आणि डेटा शास्त्रज्ञांची आमची समर्पित टीम आम्ही देऊ केलेल्या गोष्टी सुधारण्याचे आणि वाढविण्याचे काम करत राहील. यामुळे आम्ही कोणत्याही आणि आमच्या पुढे येत राहणाऱ्या सर्व धोक्यांना मागे सारत आहोत याची खात्री केली जाईल.

अद्ययावत एआय-संचालित स्पॅम उपाय आता वापरकर्त्यांना दहा भारतीय भाषांमध्ये देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्रमांकांवरील कॉल्स आणि संदेशांबद्दल सूचित करणार आहे. या भाषांमध्ये हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, कन्नड, मल्याळम, तेलुगू, पंजाबी आणि उर्दू सामील आहेत. अँड्रॉइड डिव्हाइस वापरणाऱ्या ग्राहकांसाठीच फक्त स्थानिक भाषांचा वापर करून स्पॅम अलर्ट सूचना उपलब्ध केल्या जाणार आहेत. या सर्व वैशिष्ट्यांसाठी ग्राहकांना कोणतीही रक्कम भरावी लागणार नाही आणि सर्व एअरटेल ग्राहकांसाठी ती आपोआप सक्रिय केली जाणार असून त्यासाठी त्यांना सेवा विनंती द्यावी लागणार नाही.

# फोनपेतर्फे अक्षय्य तृतीयेनिमित्त हमखास कॅशबॅक ऑफर

**मुंबई, २४एप्रिल :** फोनपे ने आज अक्षय्य तृतीयाच्या निमित्ताने २४ कॅरेट डिजिटल सोनेखरदीवर आकर्षक कॅशबॅक ऑफर्सची घोषणा केली. युझर्सनी फोनपे प्लॅटफॉर्मवर किमान रुपये २००० किमतीचे डिजिटल सोने खरेदी केल्यावर फ्लॅट १% (कमाल रुपये २००० पर्यंत) कॅशबॅक मिळू शकते. ही ऑफर फक्त ३० एप्रिल रोजी एकदाच होणाऱ्या व्यवहारासाठी लागू आहे (प्रत्येक युझरसाठी एकदाच वैध). युझर्स यूपीआय, यूपीआय लाइट, क्रेडिट आणि डेबिट कार्ड, वॉलेट आणि गिफ्ट कार्ड्ससारखे विविध पेमेंट मोड्स वापरून ही खरेदी करू शकतात.

सणाच्या उत्साहात भर घालत कॅरटलेन स्टोअर्स व वेबसाइटवर डिजिटल सोन्याच्या रिडम्प्शनसाठी फोनपेतर्फे खास ऑफर देण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत :

सोन्याच्या नाण्यावर अतिरिक्त २% डिस्काउंट, अनस्टडेड (खडे न जडवलेले) दागिन्यांवर अतिरिक्त ३% डिस्काउंट, स्टडेड (खडे जडवलेले) दागिन्यांवर अतिरिक्त ५% डिस्काउंट.

एमएमटीसी-पीएएमपी, सेफगोल्ड आणि कॅरटलेनसारख्या आघाडीच्या व विश्वासार्ह डिजिटल गोल्ड विक्रेत्यांकडून फोनपे प्लॅटफॉर्मवरून युझर्स ९९.९९% शुद्धता-प्रमाणित २४ कॅरटचे डिजिटल सोने विकत घेऊ शकतात. फोनपे प्लॅटफॉर्मवरून भारतभरातील १.२ कोटी ग्राहकांनी अधिक शुद्धता असलेले २४ कॅरटचे सोने विकत घेतले आहे.

एकवेळ खरेदीव्यतिरिक्त फोनपेतर्फे युझर्सना दैनिक वा मासिक एसआयपीच्या माध्यमातून सोन्यामध्ये डिजिटल स्वरुपात गुंतवणूक करण्यास सक्षम करते. यामुळे ग्राहकांना दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध गुंतवणूक करता येते. ग्राहकां त्यांच्या इच्छेनुसार रक्कम (किमान रुपये ५ पासून) गुंतवू शकतात, तसेच त्यांनी खरेदी केलेले सोने कधीही विकण्याची सुविधाही उपलब्ध आहे. विक्री केल्यानंतरची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होते.

* ही ऑफर ३० एप्रिल २०२५ रोजी ००:०० ते ११:५९ या कालावधीत एकदाच होणाऱ्या व्यवहारासाठी वैध आहे. ही ऑफर एसआयपी व्यवहारांवर लागू होणार नाही. प्रत्येक युझरसाठी ही ऑफर फक्त एकदाच वैध आहे.


## कार्यालय नगर परिषद भद्रावती

कर विभाग

**जाहीर निविदा सुचना**

सर्वसाधारण महिती करीता निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात येते कि, नगर परिषदेद्वारे लावण्यात आलेल्या LED स्क्रिन वर जाहिरात प्रसिद्ध करणे करीता जाहिरात देणे करीता संस्थेकडुन दर मागविणेबाबत. खालील कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन द्वि-लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा प्रसिद्धीचा तपशिल

| | |
|---|---|
| निविदा फॉर्म विक्रिची तारीख व वेळ :- | दि. २५/०४/२०२५ ला सकाळी ११.०० वाजेपासुन |
| निविदा फॉर्म स्विकारणे अंतीम तारीख व वेळ :- | दि. ०८/०५/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| अनामत रक्कम स्विकारणे अंतीम तारीख व वेळ :- | दि. ०९/०५/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक :- | दि. १३/०५/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (शक्य झाल्यास ) |

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा प्रपत्र किंमत | निविदा अनामत |
|---|---|---|---|
| १ | २०२५-२०२६ या आर्थीक वर्षासाठी नगर परिषदेद्वारे लावण्यात आलेल्या LED स्क्रिन वर जाहिरात प्रसिद्ध करणे करीता जाहिरात देणे करीता संस्थेकडुन दर मागविणेबाबत. | १०००/- | २०००/- |

अटी व शर्ती :-

१) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत संगणक विभागात पहावयास मिळतील.

मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद भद्रावती


# समर हॅक्स २०२५: झी टीव्हीवरील कलाकार सांगत आहेत त्यांच्या टिप्स टू बीट द हीट अगदी स्टाईलमध्ये!

**मुंबई, २४ एप्रिल :** जसजसा उन्हाळ्याचा तडाखा वाढतो आणि दिवस मोठे होत जातात तसतशी काही सामान्य सौंदर्य आणि आरोग्यविषयक आव्हाने आपल्यासमोर उभी राहतात. घाम येणे, त्वचेवर पुरळ येणे, सनबर्न्स आणि सतत थकवा वाटणे या सगळ्यांशी सामना करणे खरंच अवघड असू शकते. पण या मोसमात फ्रेश, हायड्रेटेड आणि तेजस्वी दिसण्यासाठी आवश्यक आहेत स्मार्ट निवडी आणि काही साध्या टिप्स! आणि जर झी टीव्हीवरील आपले आवडते कलाकार, जे दिवसभर बाहेर, तेजस्वी लाईट्सखाली, तासन्तास शूट करत असूनही नेहमी ताजेतवाने आणि सुंदर दिसतात तेच आपल्याला हे सगळं सांगत असतील तर ह्यापेक्षा उत्तम मार्गदर्शक कोण असू शकेल? या उन्हाळ्यात प्रेरणा घ्या जाने अनजाने हम मिले मधील आयुषी खुराणा, जमाई नं. १ मधील अभिषेक मलिक, कुमकुम भाग्य मधील आर्यन राजपूत, जागृति एक नई सुबह मधील रचना मिस्त्री, वसुधा मधील प्रिया ठाकूर आणि कैसे मुझे तुम मिल गए मधील आकांक्षा चमोला यांच्याकडून जे शेअर करत आहेत त्यांचे खास समर एसेंशियल्स, त्वचा आणि केसांची निगा राखण्यासाठी साध्या टिप्स, आणि उष्णतेला मात देण्यासाठी उपयोगी वेलनेस हॅक्स! मग तुम्ही घरात असाल किंवा बाहेर, हे सेलिब्रिटी-मान्य उपाय तुम्हाला उन्हाळ्यातही फ्रेश आणि कमाल वाटण्यासाठी मदत करतील स्टाईलमध्ये!

झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिलेमध्ये रीतच्या भूमिकेतील आयुषी खुराणा म्हणाली, माझे आणि उन्हाळ्याचे नातं थोडे प्रेम-वैरासारखे आहे. लहानपणी उन्हाळा म्हणजे आंबे आणि आइस्क्रीम खाणे, गारगार लिंबूपाणी पिणे आणि होमवर्कचं टेन्शन नसल्यामुळे दुपारी फक्त मित्रमैत्रिणींमध्ये बिल्डिंगमध्ये खेळत राहणे ही मजेशीर आठवण आहे. पण आता एक अभिनेत्री म्हणून उन्हाळा म्हणजे लवकर कॉल टाइम्स आणि सतत हायड्रेट करत राहणे. मी नेहमीच एक मोठी नारळपाण्याची बाटली, एक छोटासा फॅन आणि भरपूर सनस्क्रीन बरोबर ठेवते. शॉट्सच्या मध्ये मी सहसा एखाद्या सावलीच्या कोपऱ्यात गार आईस्ड कॉफी पिते किंवा थंड कलिंगड खात असते. उन्हाळ्यात सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शरीराला हायड्रेट करणे.

झी टीव्हीवरील जमाई नं.१मध्ये नीलच्या भूमिकेतील अभिषेक मलिक म्हणाला, मी आधी दिल्लीला राहत होतो, आणि दर उन्हाळी सुट्टीत डोंगराळ भागांकडे हिमाचल किंवा उत्तराखंडला जाण्याची योजना ठरलेलीच असायची. थंड, शांत पर्वतरांगांमध्ये हरवून जाणे म्हणजे खरंच स्वर्गसुख वाटायचे. पण त्या सुट्ट्यांना खास बनवायचे खरे कारण होते ते माझ्या नानीच्या घरी मला राहायला मिळायचे. रसाळ आंब्यांचा आस्वाद घेणे, चुलत भावंडांसोबत अखंड खेळ खेळणे, आणि आजी-आजोबांच्या शेजारी बसून त्यांच्या त्या अमूल्य गोष्टी ऐकणे हे सगळे कायमचे मनात कोरले गेले आहे. मुंबईला स्थलांतर केल्यावर उन्हाळ्याची अनुभूती थोडी वेगळीच झाली इथे उष्णता अधिक, दमटपणा जास्त आणि वेळही नेहमीच धावपळीचा. पण तरी मी अजूनही त्या छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधतो. सेटवर मी कायम सावलीत कुठेतरी जागा शोधतो किंवा शॉट्सच्या मध्ये फॅनजवळ उभा राहतो.

झी टीव्हीवरील कुमकुम भाग्यमध्ये मयांकच्या भूमिकेतील आर्यन राजपूत म्हणाला, उन्हाळा सेटवर एक खास ऊर्जा घेऊन येतो. दिवस लांब असतात, प्रकाश उबदार असतो, आणि त्या गोल्डन अवरच्या झळाळीमुळे प्रत्येक शॉट सिनेमॅटिक वाटतो. पण उष्णतेत शूटिंग करणे म्हणजे एक प्रकारचे आव्हानच शॉट्सच्या मध्ये घामाशी झुंजणे, कॉस्च्युम आणि मेकअपच्या थरांखाली थंड राहण्यासाठी स्मार्ट उपाय शोधणे आणि बरेच काही. यावर्षी कुमकुम भाग्यच्या टीमसोबत खूप आठवणी तयार होत आहेत छत्र्यांखाली एकत्र जमून बसणे, थंड ताक पिणे, आणि थकव्यातही हसत राहणे. उन्हाळ्यात माझ्या काही आवडत्या टिप्स म्हणजे: भरपूर पाणी पिणे, ब्लॉटिंग पेपर आणि सनस्क्रीन नेहमी जवळ ठेवणे आणि एका छोट्याशा हँडहेल्ड फॅनचं सामर्थ्य कधीही कमी न लेखणे.

झी टीव्हीवरील जागृति एक नई सुबहमध्ये जागृतिच्या भूमिकेतील रचना मिस्त्री म्हणाली, उन्हाळ्यात शूटिंग करणे सहज नाही, पण आता ते मी शिकले आहे. उन्हाळा कधी कधी खूपच तीव्र असतो, विशेषतः जेव्हा लांब लोकेशन शूट्स असतात. पण त्यातही एक गोड आठवणींचा भाव असतो मला लहानपणीचा उन्हाळा आठवतो: घरभर धावणे, थंड गुलाब सरबत पिणे आणि पंख्याखाली दुपारी झोपणे. आता सेटवर उन्हाळ्यात मी काही खास सवयी अंगीकारल्या आहेत: मी कधीच घरातून सनस्क्रीन, एक मोठी इलेक्ट्रोलाइट पाण्याची बाटली आणि थंडावा देणाऱ्या वाइप्स आणि ब्लॉटिंग पेपरचे छोटे पाउच घेतल्याशिवाय बाहेर पडत नाही.


## आज का अंदाज

शुक्रवार २५ एप्रिल २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| २५६ | २५९ | ५६८ | १४५ | २४७ | १५८ | १३३ | १२५ |
| ६८९ | १५० | ११७ | ३८९ | ६७० | ३४७ | ५५७ | ३५० |
| ३५५ | ६०० | ३७९ | २८० | ३५५ | ७८९ | २२३ | २६० |
| ३२ | ६२ | ९१ | ०१ | ३९ | ४९ | ७१ | ८१ |
| ३४ | ६४ | ९७ | ०७ | ३२ | ४२ | ७० | ८० |
| ३५ | ६५ | ९४ | ०८ | ३५ | ४५ | ७६ | ८६ |

२५ एप्रिल : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ४९ | ५३ | ८३ |
| १७ | ४७ | ५० | ८० |
| १६ | ४६ | ५२ | ८२ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** जमीन खरेदी-विक्रीत घाई करू नका. अन्यथा नुकसान होऊ शकते. आज तुम्हाला गुप्त धन प्राप्त होईल. अडकलेले पैसे मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत उच्च अधिकाजयांच्या मदतीने पैसे मिळतील.

**वृषभ :** नोकरीच्या ठिकाणी नवीन जबाबदारी मिळेल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ मिळेल. आज तुम्हाला इच्छा नसताना प्रवास करावा लागेल.

**मिथुन :** व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. जोडीदारासोबत नात्याततणाव राहील. तुमची आवडती मौल्यवान भेट मिळण्याची शक्यता आहे. जमीन आणि इमारत खरेदीची योजना यशस्वी होऊ शकते.

**कर्क :** व्यवसायाची स्थिती सुधारेल. अनोळखी व्यक्तीला पैसे देणे टाळा. चैनीच्या वस्तूंवर जास्त पैसा खर्च होईल. फालतू खर्चाशी संबंधित. संपत्ती जमा करा. लांबच्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे.

**सिंह :** राजकारणाच्या क्षेत्रात जास्त व्यस्तता असेल. प्रवासादरम्यान वाहनामुळे थोडा ताण येऊ शकतो. कुटुंबात विनाकारण वाद होऊ शकतात. नोकरी मिळवण्याच्या प्रयत्नात अपयश येवू शकते.

**कन्या :** आज तुम्हाला एखाद्या व्यक्तीकडून प्रेम प्रस्ताव मिळू शकतो. प्रेमसंबंधात असलेल्या लोकांना सुखद अनुभव येईल. वैवाहिक जीवनात जवळीकता येईल. आईकडून चांगली बातमी मिळाल्याने खूप आनंद होईल.

**तुळ :** आज प्रेम संबंधात फसवणूक झाल्यामुळे तुमच्या मनाला धक्का बसेल. कुटुंबात विनाकारण कलह निर्माण होण्याची शक्यता आहे. मारामारी दरम्यान भांडण होऊ शकते. तुम्हाला पालकांपासून दूर जावे लागेल.

**वृश्चिक :** तुमचे वाचवलेले भांडवल काही कामावर खर्च करण्यासोबतच तुम्हाला कर्ज घ्यावे लागेल. उद्योगधंद्यात नवीन सहकारी मिळतील. घरात चैनीच्या वस्तू आणाल.


**धनु :** मित्रमंडळींसोबत संगीताचा आनंद घेता येईल. तुम्हाला तुमच्या मुलांकडून सहकार्य मिळेल. आज काही जुन्या कोर्ट केसेसमध्ये विजय मिळण्याची शक्या आहे. काही महत्त्वाच्या कामासाठी आज पैशांची गरज भासेल.

**मकर :** आज कुटुंबात काही शुभ कार्यक्रम होईल. नोकरीत पदोन्नतीसह महत्त्वाचे काम करण्याची संधी मिळेल. मित्रांसोबत पर्यटनाचा आनंद घ्याल.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी जास्त धावपळ करावी लागेल. ऐषारामात प्रचंड रस वाटेल पण नको त्या प्रवासाला जावे लागेल. कोणत्याही नको असलेल्या प्रवासाला जाणे टाळा. वाटेत तुमची प्रकृती बिघडू शकते.

**मीन :** जमा झालेले भांडवल निरुपयोगी कामावर खर्च होईल. कुटुंबातील वरिष्ठ व्यक्तीशी वाद होऊ शकतो. आज तुमची तब्येत थोडी नरम राहील. तुम्हाला काही गंभीर आजार होण्याची शक्यता आहे.

## शब्दकोडे क्रमांक २०९५



**आडवे शब्द :-**
१) झुकुझुकु आगिनगाडी गाण्यातील पुढची ओळ
८) दुर्बळ, असमर्थ
११) एक कडवे धान्य
१२) समुद्राचा किनारा
१४) गणेश
१६) सूर्य
१७) वजनदार
१८) अवधान
१९) गोमाता
२०) उंटाच्या पाठीवर उंचवटा
२२) ठाणवई
२५) एक चतुर्थांश
२६) एकरूपता
२८) इंद्रिय, घटक
३०) अभिप्राय
३१) राजाला न आवडणारी राणी
३३) फोडातील द्रव
३४) रात्रीचा अखेरचा प्रहर
३५) चामखीळ
३७) दरवाजा
३९) चीजवस्तू
४१) चहापिण्याचे जोडसाधन
४४) युद्ध
४६) नखे काडण्याचे हत्यार
४७) जखमेवरील जाद झालेले कातडे
४८) तृष्णा
५०) लाकडी तटबंदी
५१) मनाचा ओढा
५२) उत्तर भारतातील एक रामभक्त संत
५५) रंग
५६) सीतापती
५७) भारताचा नागरिक
६०) दुःख, खेद
६१) आश्रय, टेका, प्रमाण
६२) गवंडी
६५) सेवक
६७) पती
६८) राजांचाही राज, सम्राट
७०) अर्धांगवायू
७१) मौज, गम्मत
७३) घाबरणे
७४) कोवळाअंकुर
७५) कपोल

**उभे शब्द :-**
२) अष्टविनायकातील एक गाव
३) सत्ताविसावे नक्षत्र
४) नगरपाल
५) लता
६) व्याकुळ, घाबरा
७) रास
८) चिवट
९) केसांची बट
१०) रात्रंदिवस
१३) दुलई
१५) दूध, पाणी
२०) माझा
२१) जिव्हा
२३) थोरवी
२४) परमेश्वर
२५) पाप दूर करणे
२६) आठवण
२७) खिडकीची काच
२८) शेळी
२९) परशुरामाची आई, रेणुकादेवी
३०) रात्रभर
३२) भीती
३५) चिंतन
३६) सासर (हिं.)
३८) करंडी
४०) दोन रत्ने
४१) लबाडी, कारस्थान
४२) थंड, गार
४३) जन्म मृत्यू
४५) प्रवासातील टप्पा
४७) धोका
४९) मोठा भाऊ
५१) कान
५२) देहूचे संत
५३) जानकी
५४) विचार मांडण्यासाठी बोलाविलेली बैठक
५५) जमीनजुमला
५६) कृष्णसखी
५८) प्रचंड रास, खरकटे वगैरेचा ढीग
५९) जेव्हा
६१) विश्रांती
६३) आगबोट
६४) पायजमा
६६) मनाला टोचणे
६९) सोन्याचा धागा, कलाबूत
७२) स्थान, जागृत

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर
शुक्रवार २५ एप्रिल २०२५
भंडारा
पान ६

## बोगस बियाणे विक्री केल्यास होणार कारावास!

प्रतिनिधी / गोंदिया

बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याच्या घटना जिल्ह्यात समोर आल्या आहेत. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ नुसार, बोगस बियाण्यांचा वापर, विक्री आणि साठवणूक हे कायद्याने गुन्हा मानले गेले आहे. या गुन्ह्यात दोषी आढळलेल्या व्यक्तींना पाच वर्षापर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांचा दंड होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी बोगस बियाण्यांपासून सावध राहण्याची गरज आहे, तसेच पक्क्या बिलाशिवाय कोणतीही नुकसान भरपाई मिळवता येत नसल्याने शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना पक्के बिल घेणे आवश्यक आहे.

खरीप हंगाम दीड महिन्यावर असल्याने शेतकरी सध्या तयारीला लागले आहेत. अशा परिस्थितीत बियाणे कंपन्यांकडून शेतकऱ्यांपर्यंत बी-बियाणे आणि कीटकनाशकांचा पुरवठा सुरु केला जात आहे. हंगामाच्या दरम्यान अनधिकृत बियाण्यांची विक्री होण्याची शक्यता आहे. हे बियाणे जमीन, पर्यावरण आणि आरोग्यास हानिकारक ठरू शकतात, तसेच ज्या बियाण्यांना शासनाची परवानगी नाही. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या वाण, तंत्रज्ञान किंवा शिफारसी असत नाहीत, तसेच त्या बियाण्यांवर तणनाशकाची फवारणी मोठ्या प्रमाणावर केल्याने कॅन्सर आणि मूत्रपिंडाचे आजार होण्याचा धोका वाढतो.

# गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना जिल्ह्यात जलसमृध्दी आणणार : आ.डॉ.फुके

### तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष कार्यशाळा

प्रतिनिधी / गोंदिया

तलावांचा जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे. जिल्ह्यात १६१७ माजी मालगुजारी तलाव आहेत. या तलावातील गाळ काढला तर पाण्याची साठवण क्षमता वाढेल आणि तोच गाळ शिवारात आल्याने उत्पादन वाढीस मदत होईल. त्यामुळे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना जिल्ह्यात जलसमृध्दी आणणार, असे प्रतिपादन आमदार डॉ.परिणय फुके यांनी केले.

गोंदिया जिल्ह्यातील पारंपरिक जलस्त्रोत असलेल्या माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आमदार डॉ.परिणय फुके यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता.२४) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे, अर्थ व बांधकाम सभापती लक्ष्मण भगत, समाज कल्याण सभापती रजनी कुंभरे, महिला व बालकल्याण सभापती पोर्णिमा ढेंगे, कृषी व पशुसंवर्धन सभापती दिपा चंद्रिकापुरे, माजी जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, नाम फाउंडेशनचे प्रतिनिधी गणेश थोरात व टाटा मोटर्सचे प्रतिनिधी शैलेश माऊलीकर मंचावर उपस्थित होते.

डॉ.परिणय फुके म्हणाले, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही मुख्यमंत्री महोदयांची महत्वाकांक्षी योजना आहे. सध्या गोंड राज्यांच्या काळात बांधले गेलेले ६,७०० हून अधिक माजी मालगुजारी तलाव गाळाने भरलेले आहेत. त्यामुळे सिंचन क्षमता कमी झाली असून भूजल पातळीही घटली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महत्वपूर्ण निर्णय घेत तलाव खोलीकरणाच्या कामातून बाहेर काढण्यात येणाऱ्या गाळावर कोणतेही स्वामित्वधन (रॉयल्टी) आकारले जाणार नाही असे स्पष्ट केले आहे. या उपक्रमाला नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स आणि महाराष्ट्र शासन यांचे सहकार्य



लाभले आहे. तलाव पुनरुज्जीवनामुळे पाणीसाठवण क्षमता वाढेल, भूजल स्तर सुधारेल, विहिरी व नळपाणी योजना कार्यक्षम होतील, शेतकऱ्यांना सिंचनासाठी भरपूर पाणी मिळेल, मासेमारी व्यवसायास चालना मिळेल आणि संभाव्य पूरपरिस्थितीवरही नियंत्रण ठेवता येईल असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकातून मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता सत्यजित राऊत यांनी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेविषयी सविस्तर माहिती विशद केली. या कार्यशाळेस गोंदिया पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सोनाली सोनुले, बाघ इटियाडोह विभागाचे कार्यकारी अभियंता राज कुरेकर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी सोनाली ढोके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मधुकर वासनिक यांचेसह सर्व जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, सरपंच, ग्रामसेवक व स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कामगारांच्या उन्नतीसाठी राज्य शासन कटिबध्द : आ राजकुमार बडोले

### कामगार बांधवांसाठी किचन साहित्य वाटप शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी / सडक अर्जुनी

अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या पुढाकाराने व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने, नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी किचन साहित्य वाटप शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबिर २३, २४ व २५ एप्रिल २०२५ या कालावधीत आशीर्वाद लॉन सडक अजुर्नी येथे आयोजित करण्यात येत आहे. या शिबिराची सुरुवात आज आमदार राजकुमार बडोले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. याप्रसंगी बोलताना आमदार राजकुमार बडोले यांनी उपस्थित कामगार बांधवांना मार्गदर्शन करत कामगार कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्य शासन कामगारांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी कटिबद्ध असून, शैक्षणिक सहाय्य, आरोग्य योजना, अपघात विमा, गृहकर्ज सहाय्य, तसेच घरगुती वापरासाठी किचन साहित्याचे वाटप यांसारख्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. यावेळी पं.स. सभापती चेतन वळगाये, पं.स. सभापती चित्रलेखा चौधरी, उपसभापती रामेश्वर महारवाडे, तहसीलदार इंद्रायणी गोमासे, पं.स. उपसभापती निशा काशिवार, जि.प. सदस्य भूमेश्वर पटले, कविता रंगारी, सुधा रहांगडाले, गिरधारी हत्तीमारे, पं सं सदस्य संगीता खोब्रागडे, शालिंदर कापगते, शिवाजी गहाणे, वर्षा शहारे, अविनाश काशिवार, राजेश कठाने, विलास बागडकर, डी. यू. रहांगडाले, रजनी गिरेपुंजे, रमेश चुऱ्हे, लक्ष्मीकांत धानगाये, तुकाराम राणे, रंजना भोई, हितेश डोंगरे, लोकचंद कापगते आदी मान्यवर आदी उपस्थित होते.



### उपक्रमामुळे कुटुंबाना थेट लाभ

**या शिबिरादरम्यान पात्र व नोंदणीकृत बांधकाम कामगारांना आवश्यक किचन साहित्याचे वाटप करण्यात येत असून, हा उपक्रम कामगार कल्याणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे, असेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना थेट लाभ मिळणार असून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यास मदत होईल, असा विश्वास आमदार बडोले यांनी व्यक्त केला.**

## राजोली अंगणवाडीत पोषण आहार पंधरवडा

**अर्जुनी मोर :** तालुक्यातील राजोली येथील अंगणवाडी केंद्रात मंगळवारी पोषण आहार पंधरवडा साजरा करण्यात आला. यानिमित्त अंगणवाडीतील बालकांना पोषक आहार देण्यात आला. तसेच पोषक आहाराचे महत्त्व त्यांच्या पालकांना पटवून देण्यात आले.

## दृष्टिक्षेप

### काठीने मारून केले जखमी

**गोंदिया :** ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत तुमखेडा येथे काठीने मारून जखमी केल्याची घटना २० एप्रिलची आहे. फिर्यादी कन्हैया लिल्हारे रा. रजेगाव हे तुमखेडा खु. येथे नातेवाईकाकडे लग्न कार्यक्रमात गेले असता, जेवन करतांनी आरोपी किर्ती मंडिये याने वाद निर्माण करून व त्यासोबती लोकेश नागपूरे या दोघांनी फिर्यादीला शिवीगाल केली तसेच काठीने मारून जखमी केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### दागिने लंपास

**गोंदिया :** अर्जुनी मोरगाव पोलिस ठाण्यांतर्गत महागाव येथे घरफोडी करून अज्ञात चोरट्यांनी दागिन्यासह ५६ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना २२ एप्रिल रोजी उघडकीस आली. फिर्यादी सुधाकर कवडू गहाणे रा. महागाव हे कुटुंबासह झोपले असतांना अज्ञात चोरट्यांनी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून आलमारीत ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख २५ हजार २०० रुपये असा एकूण ५६ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### उन्हाळ्यात अननस फायदेशीर

**गोंदिया :** उन्हाळ्यात अननस खाल्ल्याने शरीरातील फॅट्स आणि प्रोटिन्स सहजपणे पचवले जातात. तसेच शरीरातील उष्णतेला नियंत्रित ठेवण्यास देखील अननसामुळे मदत होते. अननसाच्या आंबटगोड चवीमुळे जिभेचे चोचले देखील पूर्ण होतात. याव्यतिरिक्त रक्तातील साखरेचे प्रमाण आणि पोटॅशियम आणि मॅग्नेशियमच्या मुबलकतेमुळे अननस हा एक योग्य प्री-वर्कआउट स्नॅक देखील मानला जातो जो स्नायूंचे कार्य सुधारतो. मात्र मधुमेहींनी अननस किंवा अननसाचा ज्यूस टाळावा कारण त्यात साखरेचे प्रमाण जास्त असते. मधुमेह असलेले बरेच लोक फळे टाळतात, कारण त्यांना असं वाटतं की, फळांमधील गोडपणामुळे त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी वाढेल. मात्र, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की फळांमधील गोडपणा प्रामुख्याने नैसर्गिक असतो, त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांना याचा काहीही त्रास होत नाही. हे फळ फायबर, मायक्रोन्युट्रिएंट्स आणि अँटिऑक्सिडंट्सचा उत्कृष्ट स्रोत आहेत, हे सर्व मधुमेह रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण आहेत.

# सिंचनापासून कुणीही शेतकरी वंचित राहू नये : आ.रहांगडाले

प्रतिनिधी / तिरोडा

सिंचन प्रकल्प मंजूर करण्यात तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले हे नेहमी अग्रेसर असून धापेवाडा उपसा सिंचन योजना यांच्याच कारकिर्दीत कार्यान्वित झालेली आहे.

धापेवाडा उपसा सिंचन योजनेअंतर्गत बोदलकसा डाव्या कालव्यावरून आलेझरी लघु कालवा तसेच भदभदया गुरुत्वाकर्षण फिडर कालव्याचा उगम स्थानाची प्रत्यक्ष जाऊन पाहणी करून कालवा सरेखन आखणी केली जेणेकरून जास्तीत जास्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळेल, यासोबतच कोवेसर तलावाची पाहणी करून गावक-यांच्या मागणीनुसार या तलावात बोदलकसा गुरुत्वाकर्षण फिडरद्वारे



पाणी सोडण्याचे नियोजन करण्याबाबत निर्देश दिले. यामुळे बेरडीपार येथील शेतक-यांची सिंचनाच्या पाण्याची समस्या दूर होई.ल याकरिता तातडीने सर्वेक्षण करून तलावाचा कालव्याचे नूतनीकरण करण्याचे निर्देश दिले. या भेटीदरम्यान कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जितेंद्र रहांगडाले, उपसा सिंचन कार्यकारी अभियंता अंकूर कापसे, सहायक अभियंता पंकज गेडाम, भोसले, सरपंच मिलिंद कुंभरे व गावकरी उपस्थित होते.

# जागतिक वसुंधरा दिन शिक्षकांची कार्यशाळा

### राष्ट्रीय हरित सेनेचा पुढाकार

प्रतिनिधी / तिरोडा

प्रत्येक वर्षी २२ एप्रिल हा दिवस जागतिक वसुंधरा दिवस (वर्ल्ड अर्थ डे) म्हणून साजरा करण्यात येतो त्याअनुषंगाने २२ एप्रिल रोजी जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे दुपारी २ वाजता जिल्ह्यातील नोंदणीकृत राष्ट्रीय हरित सेना विद्यालयातील समन्वयक शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करून जागतिक वसुंधरा दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात जिल्हाधिकारी प्रजित नायर तसेच उपवन संरक्षक प्रमोद कुमार पंचभाई, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरणचे तुषार ढमढेरे, पी एस तडस, मानद वन्यजीव रक्षक मुकुंद धुर्वे,रुपेश निंबार्ते,सावन बहेकार, तिरोडाचे वनपरिक्षेत्राधिकारी शेषराज के.आकरे, एफ आर आजमी ए.एम.मेश्राम तसेच जिल्ह्यातील राष्ट्रीय हरित सेना अंतर्गत नोंदणीकृत विद्यालयातील २५० शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वटवृक्ष



पूजन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे सुरुवातीला रोपटे, पुस्तके तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेले सीड बॉल, कागदी ग्रीटिंग कार्ड देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले व त्यानंतरे विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरणचे तुषार ढमढेर यांनी प्रस्तावना केली त्यानंतर उपस्थित शिक्षकांपैकी प्रत्येक तालुक्यातील एक प्रतिनिधी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले व हरित सेना अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी वसुंधरा दिनानिमित्त याविषयी माहिती सांगण्यात आली जागतिक वसुंधरा दिनानिमित्त जिल्ह्यातील राष्ट्रीय हरित सेना अंतर्गत विविध शाळेतील शिक्षकांनी आपापल्या संवादातून नवसंकल्पना सादर केल्या. पर्यावरण,निसर्ग संरक्षण व संवर्धनासंबंधी काम करणाऱ्या अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी सावंत बहेकार, मुकुंद धुर्वे,रूपेश निबार्ते यांनी पर्यावरण व निसर्ग संरक्षण व संवर्धनाबाबत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शेषराज के.आकरे यांनी केले.

# अतिक्रमण धारकांचे प्रकरण त्वरीत निकाली काढा

### सभापती चेतन वळगाये यांची मागणी

प्रतिनिधी / सडक अर्जुनी

तालुक्यात दोन दशकापासून काही भुमीहिन व अल्पभूधारक अतिक्रमण धारकांनी आपल्याला पट्टे मिळावे ह्या आशेने फाईल तयार करुन शासकीय कार्यालयाच्या चकरा मारत आहेत. परंतु अपद्यापर्यंत पट्टे मिळाले नाही. तर काहींच्या फाईल गहाळ झाल्या आहेत. ही बाब सभापती चेतन वळगाये यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी हे प्रकरण त्वरित निकाली काढण्यात यावे, या मुख्य मागणीला घेवून उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले आहे.



अतिक्रमण धारकांचे प्रकरण निकाली लागावे त्या करीता आमदार राजकुमार बडोले यांनी अतिक्रमण धारकांसाठी जनता दरबाराचे आयोजन करून अनेक प्रकरण निकाली काढण्यात आले परंतु सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा, म्हसवानी, चिरचाडी, कोहळीटोला, डोंगरगांव, रेंगेपार,कोहमारा, राका, पळसगांव, दल्ली, राजगुडा यासह अनेक गावातील अतिक्रमण धारकांचे प्रकरण प्रलंबित आहेत तरी त्या सर्व प्रकरणाची गावनिहाय यादी तयार करुन हे प्रकरण निकाली काढण्यात यावे, या संदर्भात सडक अर्जुनी पंचायत समिती चे सभापती चेतन वळगाये यांनी उपविभागीय अधिकारी यांना २२ एप्रिल रोजी निवेदन दिले.व त्वरित हे प्रकरण निकाली काढण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

# मनरेगा देणार ४.३२ लाख कामगारांना रोजगार!

### आयुक्तांनी दिली कामांवर भेट

प्रतिनिधी / गोंदिया

ग्रामीण भागातील कामगारांचे स्थलांतरण थांबावे यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक कामगाराला १०० दिवस रोजगार मिळावा हा उद्देश आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यात कामेही सुरू आहे. त्यातच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे आयुक्त डॉ.भरत बास्टेवाड यांनी आयुक्त पदाचा पदभार सांभाळल्यानंतर पहिलाच दौरा केला. यावेळी त्यांनी अनेक कामांवर दुचाकीने जात मजुरांशी संवाद साधला. तसेच जिल्ह्यात ४ लाख ३२ हजार कामगार ॲक्टीव असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

आर्थीक वर्षात राज्यात १३.५० कोटी लाख मनुष्यदिवस कामाचे व जिल्ह्यात सन २०२५-२६ जिल्ह्यातील मजुरांना ७८ लाख मनुष्यदिवस काम देण्याचे नियोजन असून जिल्ह्यात ४ लाख ३२ हजार मजूर ॲक्टीव्ह असल्याची माहिती मनरेगाचे आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांनी आयोजित पत्र परिषदेच दिली. सध्या जिल्ह्यात ६९ हजार कामावर असून जिल्हा राज्यात तिसरा आहे. २१ एप्रिल रोजी जिल्ह्यात सुरू असलेल्या मनरेगाच्या कामावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

दरम्यान, डॉ. बास्टेवाड यांनी गोंदिया तालुक्यातील आसोली या गावाला भेट दिली असता



त्याठिकाणी सुरू असलेल्या महिला भवन, सिमेंट रस्ता व पाझर तलावाचा गाळ काढण्याचे कामावरील मजुरांशी त्यांनी संवाद साधला. त्यानंतर अजुर्नी येथे मनरेगाच्या कामाची पाहणी केली. पुढे माहिती देताना डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले की, महाराष्ट्र मनरेगाची ११ लाख कामे अपूर्ण आहेत. त्यातील ५ ते ६ लाख कामे यंदा पूर्ण केली जाणार आहेत. ३३०० कोटी कुशल कामाचे तर १३०० कोटी अकुशल कामाचे केंद्राकडून येणे बाकी आहे. तो निधी आल्यास त्वरीत तो वितरीत करण्यात येईल.

मागच्या वर्षात गोंदिया जिल्ह्याने मनरेगाचे ११६ टक्के काम केले आहे. मागेल त्या प्रत्येकाला काम देण्यास आम्ही तत्पर असल्याचे डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले आहे. यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहरे, अप्पर उपायुक्त सुधीर मोहरीर आदी उपस्थित होते.

# गोंदिया जिल्ह्याच्या शिरपेचात डव्वा ग्रामपंचायत तिने घातला मानाचा तुरा

प्रतिनिधी / गोंदिया

गोंदिया जिल्हा परिषद अंतर्गत सडक अर्जुनी पंचायत समिती येथील डबा ग्रामपंचायत ने देश पातळीवर हवामान बदलाचे दुष्परिणाम थांबविण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल देश पातळीवर क्लायमेट ॲक्शन स्पेसिअल पंचायत अवॉर्ड हा प्रथम पुरस्कार पटकाविला असून एक कोटी रुपयांचा पुरस्कार प्राप्त केलेला आहे.

सदर पुरस्कार हा गोंदिया जिल्ह्यातील इतिहासात स्वर्णिम अक्षरात लिहिला जाईल अशा पद्धतीच्या असून यापूर्वी असा एकल पुरस्कार कोणत्याही ग्रामपंचायतला देश पातळीवर मिळालेला नव्हता. सध्याच्या स्थितीत हवामान बदलामुळे मोठे दुष्परिणाम संपूर्ण जगाला जाणवत आहे हवामानाच्या बदल होऊन अवकाळी पाऊस, मोठ्या प्रमाणात उष्णतेची लहर



आणि अनिश्चित हवामानामुळे पृथ्वीवर सजीव सृष्टीला धोका निर्माण होण्याची शक्यता बळवलेली आहे अशावेळी हवामानाला नैसर्गिकरित्या संतुलित ठेवून होणाऱ्या दुष्परिणाम पासून बचाव करण्यासाठी उपाययोजना करण्याची मोठ्या प्रमाणात गरज आहे जल, जंगल, जमीन, हवा पाणी या सर्व गोष्टींना संरक्षित करण्याची गरज आहे आणि ह्या सगळ्या कामगिरी नैसर्गिक पद्धतीने केलं पाहिजे याकरता पृथ्वीवर वाढणारा प्रदूषणाला तापमानाला कमी करण्यासाठी उर्जे करता अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या वापर करण्यासाठी डव्वा ग्रामपंचायत ने पुढाकार घेतला असून अनेक उपाययोजना त्यात मग प्लास्टिक बंदी असेल, फटाके बंदी असेल, पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या वापर कमी करणे असेल अशा विविध पातळीवर काम डबा ग्रामपंचायत न केले त्यामुळे डव्वा ग्रामपंचायतला क्लायमेट ॲक्शन स्पेसिअल पंचायत अवॉर्ड म्हणून पुरस्कृत करण्यात आलेले आहे हा पुरस्कार देशपातळीवर मानाचा ठरलेला असून गोंदिया जिल्ह्याच्या शिरपेच्यात मानाच्या तुरा रोवला गेलेला आहे त्यामुळे संपूर्ण ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या माध्यमातून या अवार्ड करता ज्यांनी ज्यांनी मदत केली ज्यांच्या ज्यांच्या सहभाग होता मार्गदर्शन होता त्या सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आलेले आहे.

यामध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष लायकरामजी भेंडारकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरगानांथम एम त्याचप्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे, पंचायत चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर वासनिक तसेच मुख्य धुरा सांभाळणारे डव्वा ग्रामपंचायतच्या सरपंच योगेश्वरी चौधरी व ग्रामपंचायत अधिकारी सिंधू सूर्यवंशी या सर्वांच्या कामाचं गौरव करून यांचं अभिनंदन ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे आणि गाव पातळीवर अशाच पद्धतीने कार्य गोंदिया जिल्ह्यात सुरू राहील आणि पर्यावरणाला बाधा होऊ न देता विकास साध्य केला जाईल अशी ग्वाही यावेळी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी दिली. केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजना ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवून शाश्वत विकास साध्य करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व सर्व पदाधिकारी यांच्या मदतीने विकास साध्य करण्यासाठी कटिबद्ध आहेत आणि त्यामुळे अशा प्रत्येक नाविन्यपूर्ण उपक्रमला गौरव करण्याच्या त्यांना प्रोत्साहित करण्याचे काम ग्रामपंचायत अधिकारी संघटना गोंदिया जिल्ह्याच्या माध्यमातून करण्यात येत असतो अशी माहिती ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी यावेळी व्यक्त केली.

सदर शिष्टमंडळामध्ये ग्रामपंचायत अधिकारी संघटना जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन, सरचिटणीस कुलदीप कापगते, प्रशिद्धी प्रमुख रामेश्वर जमाईवार उपाध्यक्ष सचिन कुथे, पदाधिकारी भारती वाघमारे, शैलेश परिहार कोषाध्यक्ष, योगेश रुद्रकार, योगराज बिसेन, रजनी सहारे, रितेश सहारे, सुरेश वाघमारे, टिकाराम जनबंधू, प्रदीप ठाकरे, किशोर आचले, नरेंद्र गोमासे, नम्रता रंगारी, ओ. जी बिसेन, हंसराज गजभिये, मुन्ना बीसेन, अजय रामटेके, तारेस कुबडे, दीपक फुले, रवी अंबाडे, निशिकांत मेश्राम, गायक कुमार ठाकूर, राठोड, रेवतकर ईत्यादी उपस्थित होते.

# अस्मिता

## मोठा अनुभव, अफाट कार्यक्षमता

मानिनी

भारतीय परराष्ट्र सेवा अर्थात आयएफएस अधिकारी निधी तिवारी यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खाजगी सचिवपदी नियुक्ती करण्यात आल्याची बातमी अनेकींनी वाचली असेल. २०१४ बॅचच्या आयएफएस अधिकारी तिवारी सध्या पंतप्रधान कार्यालयात (पीएमओ) उपसचिव म्हणून कार्यरत असून मध्यंतरीच त्यांच्या खांद्यावर एक मोठी जबाबदारी आली आहे. तेव्हा निधी तिवारी यांच्याविषयी सविस्तर जाणून घेऊ या.

भारत सरकारने भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी निधी तिवारी यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवीन वैयक्तिक सचिव (खाजगी सचिव) म्हणून तात्काळ प्रभावाने नियुक्ती केली आणि हे नाव चर्चेत आले. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (डीओपीटी) जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने यास मान्यता दिली आहे. २०१४ च्या बॅचच्या भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी निधी तिवारी २०२२ मध्ये अवर सचिव म्हणून रुजू झाल्यानंतर सहा जानेवारी २०२३ पासून पंतप्रधान कार्यालयात उपसचिव म्हणून काम करत आहेत.

मनोरंजक गोष्ट म्हणजे तिवारी २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकसभा मतदारसंघातील म्हणजेच वाराणसी येथील आहेत. त्यांनी वाराणसीमध्ये सहाय्यक आयुक्त (वाणिज्यिक कर) म्हणून काम केले. त्यानंतर २०१३ मध्ये नागरी सेवा परीक्षेत ९६ वा क्रमांक मिळवला. पंतप्रधान कार्यालयात उपसचिव असताना निधी तिवारी यांनी 'परराष्ट्र आणि सुरक्षा' विभागात काम केले आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोवाल यांना अहवाल दिला.



आता त्या वेतन मॅट्रिक्सच्या लेव्हल १२ वर खाजगी सचिव म्हणून कार्यरत आहेत. ही नियुक्ती सह-टर्मिनस आधारावर करण्यात आली आहे. पंतप्रधानांचे खाजगी सचिव हे पद अतिशय महत्त्वाचे आणि प्रतिष्ठित असते हे आपण जाणतो कारण या पदावरील अधिकारी देशाच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांशी थेट व्यवहार करतात. पंतप्रधान कार्यालयात येणाऱ्या फायली, पत्रे आणि महत्त्वाची कागदपत्रे खाजगी सचिवच हाताळतात. सर्व सरकारी प्रस्ताव, विधेयके, आदेश आणि अहवाल पंतप्रधानांना पाठवणे हा त्यांच्या कार्याचा एक भाग असतो.

पंतप्रधानांचे खाजगी सचिव सहसा आयएएस, आयएफएस, आयपीएस किंवा इतर वरिष्ठ अधिकारीच असतात. या पदावर काम करण्यासाठी प्रशासकीय कार्यक्षमता, मुत्सद्देगिरी आणि कार्यक्षम व्यवस्थापनाचा अनुभव आवश्यक असतो. त्याला सुरक्षा मंजुरी असणेही आवश्यक असते आणि या पदावर असणाऱ्या व्यक्तीने गोपनीयता नियमांचे कडक पालन करणेही आवश्यक आहे. हा सर्व पात्रता पूर्ण करुनच निधी तिवारी यांची नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांच्यातील कौशल्याचे दर्शन घडते. निधीजींना भारतीय राजकारण आणि प्रशासनाची सखोल समज आहे. आता मोठ्या अनुभवामुळे त्या परराष्ट्र धोरण, सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींशी संबंधित मुद्यांवर विशेष लक्ष देतील, याची खात्री वाटते.

## जुळ्यांना जन्म देताना...

आरोग्य जपा



अलिकडेच गुंतागुंतीच्या प्रसुतीमध्ये एका मोठ्या रुग्णालयाने उपचारास विलंब केल्याच्या कारणास्तव महिलेचा मृत्यू झाल्याची घटना चर्चेत आली. या महिलेने जुळ्या मुलींना जन्म दिला होता. म्हणूनच या निमित्ताने जुळी मुले असताना गर्भधारणेची प्रक्रिया सामान्य गर्भधारणेच्या तुलनेत काही जोखमांनी भरलेली असू शकते यावरही चर्चा व्हायला हवी. जुळी मुले म्हणजे एकाच गर्भधारणेमध्ये दोन बाळांची वाढ होणे. या गर्भधारणेमध्ये काही वैद्यकीय जोखमांचा सामना करावा लागू शकतो.

प्रारंभिक टप्प्यांमध्ये जुळ्या गर्भधारणेत गर्भपात होण्याची शक्यता अधिक असते. यामध्ये दोन बाळांची एकाच वेळी वाढ होणे आणि त्यातील एक किंवा दोन्ही बाळांचे जीव धोक्यात येण्याचा धोका असतो. जुळी मुले गर्भधारणेतील बाळांचा प्रमाणित वेळेपूर्वी जन्म होण्याची शक्यताही अधिक असते. नऊ महिन्यापूर्वीच प्रसूती झाल्यास त्याचा बाळांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. गर्भात जुळे असल्यास मातेला अधिक शारीरिक ताण आणि मानसिक दडपण येऊ शकते. विशेषतः दोन्ही बाळांच्या वाढीसाठी अधिक पोषण घेणे आणि शरीराची जास्त काळजी घेणे आवश्यक असते.

अशा गर्भधारणेतील जोखीम टाळण्यासाठी संबंधित गर्भवती महिलेला तज्ज्ञ डॉक्टरांच्या वारंवार देखरेखेची आवश्यकता असते. यासाठी नियमित तपासण्या गरजेच्या ठरतात. अर्थातच या सर्व जोखमांचा सामना करण्यासाठी योग्य वैद्यकीय सल्ला आणि काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. जुळी मुले असल्यास बाळांचे वजन कमी असू शकते. असे असल्यास त्यांना विशेष तज्ज्ञांच्या देखरेखीखाली ठेवणे अत्यावश्यक ठरते. जुळ्या गर्भधारणेत प्लेसेंटाची कार्यक्षमता कमी होण्याचा धोकाही नाकारता येत नाही. त्यामुळे पोषणाची कमी होऊ शकते आणि बाळांच्या वाढीवर परिणाम बघायला मिळतो. गर्भात जुळी मले शरीर अधिक श्रमत असल्यामुळे गर्भवतीला अधिक विश्रांती आणि पोषणाची आवश्यकता असते. म्हणूनच कुटुंबीयांनी या महिलेची अधिक काळजी घ्यायला हवी. तिच्यावरील मानसिक ताण नियंत्रित ठेवण्यासाठी विशेष तज्ज्ञांचे साह्य घ्यावे. प्रसुतीनंतर तिला समुपदेशनाची गरज भासू शकते कारण दोन्ही बाळांची काळजी घेणे आणि त्यांचे संगोपन करणे जास्त जटिल असते.

म्हणूनच अशा गर्भधारणेच्या काळात डॉक्टरांनी सांगितलेल्या नियमित तपासण्या, योग्य पोषण आणि तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काळजी घेणे टाळू नये. वेळेवर उपचार मिळाल्यास आणि काळजी घेतल्यास गर्भधारणेची प्रक्रिया सुरक्षितपणे पार पडू शकते.

## पर्याय स्व-प्रकाशनाचा

स्कील डेव्हलपमेंट

बऱ्याच महिलांना लेखनात गती असते. त्यांना आपले विचार प्रभावीपणे मांडायचे असतात. अशा वेळी पुस्तक लिहिण्याचा पर्याय निवडला जातो. आपलं पुस्तक तयारही होतं. पण प्रकाशनाचं काय? पुस्तक प्रकाशित करण्याची प्रक्रिया प्रचंड गुंतागुंतीची असते. प्रकाशकांचे उंबरे झिजवावे लागतात. नकार पचवाले लागतात. अशा वेळी 'सेल्फ पब्लिशिंग' किंवा 'स्व-प्रकाशन' ही संकल्पना आपल्या कामी येते. सेल्फ पब्लिशिंग ही संकल्पना भारतात नवी असली तरी आता बाळसं धरू लागली आहे. तेव्हा तुमच्या मनातही पुस्तक लिहिण्याचे विचार घोळत असतील तर या सेल्फ पब्लिशिंग टिप्स उपयोगी पडतील.



✻ पुस्तक लिहिल्यानंतर तुम्ही ते दोन ते तीन वेळा वाचलं. आता तुमचं हस्तलिखित प्रकाशनासाठी पाठवायचं आहे. ते पाठवून द्या. यानंतर आपल्या लेखनाचा फार विचार करू नका.

✻ सेल्फ पब्लिशिंगचा मार्ग अवलंबल्यानंतर पुस्तकाची सगळी प्रसिद्धी ऑनलाईन, सोशल मीडियाद्वारे होते. थोडा खर्च करायची तयारी असेल तर पुस्तक संपादित करून घ्या. यामुळे पुस्तकाला नवा लूक मिळेल.

✻ पुस्तक प्रकाशनानंतर तुमचं खरं काम सुरू होतं. संपादनाचे संस्कार झाल्यानंतर कुटुंबिय आणि मित्रमंडळींसाठी छोटेखानी प्रकाशन सोहळा आयोजित करा. त्यांच्याकडून प्रतिक्रिया घ्या. या प्रतिक्रिया सोशल मीडियावर पोस्ट करा.

✻ तुमचं पुस्तक प्रत्येकालाच आवडेल असं नाही. त्यामुळे नकारात्मक प्रतिक्रियांना घाबरू नका. या प्रतिक्रियांचं स्वागत करा. त्याद्वारे तुम्हाला सुधारणा करता येतील.

✻ बऱ्यापैकी बजेट असेल तर पी.आर. एजन्सीची सेवा घ्या. तुमच्या पुस्तकाची माहिती विविध वृत्तपत्रांना पाठवा.

✻ ॲमेझॉनसारख्या साईटवर चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या तर तुमच्या पुस्तकाला चांगला प्रतिसाद मिळेल. युवा वाचकवर्ग चांगल्या लिखाणाच्या शोधात असतो. त्यामुळे ॲमेझॉनसारख्या साईट्सद्वारे तुम्ही पुढे जाऊ शकता.



## 'स्लीप डिव्होर्स' घेताय?

सहजीवन

आजकाल 'स्लीप डिव्होर्स' हा शब्द चर्चेत आहे. याचा अर्थ नातेसंबंध तुटणे असा नाही तर झोपण्याची वेगळी व्यवस्था असणे असा आहे. म्हणजेच, जोडपे एकत्र राहूनही वेगवेगळ्या बेडवर किंवा खोल्यांमध्ये झोपत असेल तर त्याला 'स्लीप डिव्होर्स' म्हणतात. तुम्हाला हे वाचून आश्चर्य वाटेल की, सध्या भारतातील ७८ टक्के जोडपी एकाच बेडवर झोपण्याऐवजी वेगळे झोपणे पसंत करतात. तेव्हा या नवीन प्रकारच्या घटस्फोटाबद्दल सविस्तर जाणून घेऊ या.

जोडीदाराचे जोरात घोरणे, झोपेत हालचाल करणे, वारंवार कूस बदलणे किंवा निद्रानाश अशा समस्या असतील तर दुसऱ्याची नीट झोप होत नाही. काही लोक लवकर झोपतात तर काही उशिरापर्यंत जागे राहतात. एकाला रात्रीचा प्रकाश आवडतो आणि दुसऱ्याला अंधार आवडतो. एक जोडीदार थंड हवेत झोपतो आणि दुसऱ्याला उबदार वातावरण आवडते. कधीकधी पालक मुलांसोबत झोपणे पसंत करतात किंवा पाळीव प्राणी झोपेत व्यत्यय आणतात. अशा एक ना अनेक कारणांमुळे जोडीदार वेगळे झोपणे पसंत करतात. एक रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करत असेल आणि दुसरा दिवसाच्या शिफ्टमध्ये काम करत असेल तर शांत झोपेची गरज पूर्ण करण्यासाठी ते वेगळे झोपण्याचा निर्णय घेऊ शकतात.

वेगवेगळे झोपल्याने दोघांनाही चांगली झोप मिळते आणि मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारते ही यातील जमेची बाब म्हणावी लागेल. शांत झोपेअभावी त्यांच्यामध्ये भांडणे होत असतील तर वेगळे झोपल्याने ही समस्या कमी होऊ शकते. अनेकांना स्वतःची स्पेस हवी असते. अशी जोडपीही हा निर्णय घेऊन मोकळे होतात. मात्र याचा नकारात्मक परिणामही लक्षात घ्यायला हवा. वेगळे झोपल्याने भावनिक संबंध कमी होऊ शकतात, असे काहींना वाटते. जोडपे एकत्र झोपत नाही तेव्हा शारीरिक आणि प्रेमसंबंधांवरही त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. वेगळे झोपणे म्हणजे नात्यात समस्या असल्याचे द्योतक असल्याचेही काहींचे म्हणणे आहे. म्हणूनच या बदलत्या ट्रेंडचे गांभीर्य जाणून घ्यायला हवे.

झोपेची समस्या दोघांमधील नात्यावर परिणाम करत असेल तर वेगळे झोपणे फायदेशीर ठरु शकत नाही कारण प्रपंचात नात्यामध्ये प्रेम आणि भावनिक संबंध टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी संवाद महत्त्वाचा आहे. तेव्हा तुम्हीही 'स्लीप डिव्हॉर्स' घेत असाल तर दिवसभरात काही वेळ एकत्र घालवा. भावनिक संबंध मजबूत करा आणि नात्यातील प्रेम टिकवून ठेवा.

## रागावर नियंत्रण हवं

स्मार्ट टॉक



मी ३८ वर्षांची महिला असून लोकांशी खूप कठोरपणे वागू लागले आहे. मला खूप राग येतो आणि या रागावर नियंत्रण मिळवणं शक्य होत नाही. रागीट स्वभावामुळे जोडीदारासोबत सतत खटके उडतात. बऱ्याच नात्यांमध्ये वितुष्टही येऊ लागलं आहे. रागाच्या घातक परिणामांची मला कल्पना आहे. पण त्यावर नियंत्रण मिळवणं शक्य झालेलं नाही. या रागीट स्वभावामुळे सगळे मला सोडून जातील की काय, अशी सतत भीती वाटत रहाते. मी काय करू?

– सखी, रागाची भावना खूप कमी वेळात माणसाला आपल्या ताब्यात घेते. रागावर नियंत्रण मिळवणं खूप कठीण असतं. तुला रागीट स्वभावाची जाणीव होणं ही खूप चांगली बाब आहे. राग या भावनेला नेहमीच दुय्यम स्थान दिलं जातं. राग येण्याआधी आपल्यासोबत काही तरी घडलेलं असतं. तेव्हा तुझ्या रागामागची कारणं समजून घे. कोणत्या गोष्टींमुळे तुझी चिडचिड होते हे आधी जाणून घे. अशी परिस्थिती समोर आल्यानंतर स्वतःचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न कर. आवडीच्या गोष्टी करण्यावर भर दे. मेडिटेशन, योगाद्वारे यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न कर. अशा उपायांचा फायदा झाला नाही तर समुपदेशकांची मदत घ्यायला घाबरू नकोस.

## कोणती लिपस्टिक निवडणार?

ब्युटी टॉक

बाजारात विविध रंगाच्याच नाहीत तर प्रकारच्या लिपस्टिक्स मिळतात. मॅटे, ग्लॉसी, क्रिमी, लिक्विड, शाईनी असे असंख्य प्रकार पहायला मिळतात. यापैकी लिपस्टिकचा कोणता प्रकार चांगला दिसेल, कोणती लिपस्टिक ओठांवर अधिक काळ टिकेल, कधी कोणती लिपस्टिक लावावी याबाबत पुरता गोंधळ उडालेला असतो. चला तर मग, लिपस्टिकच्या या विविध प्रकारांची माहिती घेऊ.

✻ मॅटे लिपस्टिक सर्वसाधारणपणे गडद रंगात मिळतात. लिपस्टिकच्या या प्रकारात ओलावा कमी असल्यामुळे फुटलेल्या किंवा पातळ ओठांवर त्या चांगल्या दिसत नाहीत. मॅटे लिपस्टिक्स अधिक काळ टिकून रहातात. त्यामुळे दिवसभर छान दिसायचं असेल तर मॅटे लिपस्टिक्स ट्राय करा.

✻ क्रीमी लिपस्टिक्समध्ये वॅक्स घातलं जातं. अशा लिपस्टिक्स ओठांच्या दृष्टीने चांगल्या मानल्या जातात. मॅटेच्या तुलनेत या लिपस्टिक्समध्ये ओलावा अधिक असतो. मॅटे आणि ग्लॉसी या दोन लिपस्टिक्सच्या मधला प्रकार म्हणजे क्रीमी लिपस्टिक. या लिपस्टिक्स बराच काळ टिकतात. मात्र या लिपस्टिक्सचा वापर थंडीत करणं योग्य ठरतं.



## उन्हाळ्यातील सुपरफूड

स्टे हेल्दी

उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घेणे गरजेचे असते. यासाठी सर्वप्रथम आहार बदला. या दिवसांमध्ये हवामानात अचानक बदल होतो. तापमानात चढउतार होत असल्याचा आरोग्यावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत बदलत्या हवामानात शरीर निरोगी ठेवण्यासाठी कामी येणाऱ्या काही महत्त्वपूर्ण टिप्स...







✻ या उष्ण दिवसांमध्ये ज्वारीपासून तयार होणारे अन्नपदार्थ खाल्ल्याने शरीर थंड राहते. उन्हाळ्यात याचा विशेष लाभ मिळतो. ज्वारी प्रथिने आणि खनिजांचा चांगला स्रोत आहे. ज्वारीची भाकरी अत्यंत पौष्टिक असते. भाकरीच्या सेवनाने पचनक्रियाही सुधारते.

✻ या उष्ण दिवसांमध्ये भाजलेले हरभरे खाल्ल्याने शरीरातील फायबर आणि प्रथिनांची कमतरता भरुन निघते. हरभरे शरीराला ऊर्जा देतात आणि आतड्यांचे आरोग्य देखील सुधारते. त्यामुळेच दररोज मूठभर भाजलेले हरभरे खाल्ल्याने तुम्ही दिवसभर सक्रिय राहता.

✻ कारले ही एक उत्कृष्ट भाजी आहे. यात बॅक्टेरिया आणि विषाणू नष्ट करण्याची क्षमता असते. कारले खाल्ल्याने यकृत आणि रक्त शुद्ध होते तसेच शरीरातील विषारी पदार्थांचे प्रमाणही कमी होते.त्यामुळेच उष्णतेचा प्रकोप असताना दररोज अर्धा ग्लास कारल्याचा रस प्यायल्याने शरीरातील उष्णतेपासून आराम मिळतो.

✻ गोंद कतिरा हा शरीराचे तापमान कमी करणारा एक थंड घटक आहे. डिंकाचा हा खास प्रकार पाण्यात भिजवून रात्रभर तसाच ठेवा आणि सकाळी दूध अथवा फळांच्या ताज्या रसासवे घ्या. हे खास पेय शरीरा हायड्रेट करते आणि उष्माघाताचा धोका टळतो.

✻ कडुलिंबाच्या पानांमध्ये घातक जिवाणूंच्या वाढीस प्रतिबंध करणारा घटक तसेच काही बुरशीनाशक गुणधर्म असतात. त्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी कडुलिंबाचा रस घेतल्यास फायदा होतो. हंगामी आजारांपासून संरक्षण करण्यासाठी तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही कडुलिंबाच्या पानांचा रस घेणे योग्य ठरते.

स्कीन केअर

### फक्त पाच थेंबांमुळे...

चेहरा छान उजळ आणि चमकदार दिसण्यासाठी मेक अप प्रोडक्ट्स वापरण्याची गरज नाही. यासाठी एका तेलाचे पाच थेंब पुरेसे आहेत. तिळाचं तेल त्वचेच्या दृष्टीने आरोग्यदायी मानलं जातं. कोरडी आणि निस्तेज त्वचा असणाऱ्यांनी तिळाच्या तेलाचा नियमित वापर करायला हवा. यासाठी तिळाचे फक्त पाच थेंबच घ्या. त्वचेला आर्द्रता मिळवून देण्यासाठी सकाळ-संध्याकाळ तिळाच्या तेलाने मसाज करायला हवा. तिळाचं तेल सनस्क्रीनसारखंही वापरता येईल. कोणत्याही तेलात तिळाचं तेल मिसळून लावा. तांदूळ दाणेदार वाटून घ्या. त्यात तिळाचे पाच थेंब घाला आणि स्क्रबप्रमाणे लावा. तिळाचं तेल उष्ण असल्यामुळे फक्त पाच थेंब वापरायचे आहेत हे लक्षात ठेवा.



स्मार्ट टिप्स

### पादत्राणं खरेदी करताना...

कपडे, दागदागिने यांच्याप्रमाणेच पादत्राणांची खरेदी नेमकेपणाने करायला हवी. चुकीच्या पादत्राणांमुळे पाठीच्या कण्यालाही त्रास होऊ शकतो. पादत्राणं आरामदायी असायला हवीत. बहुतांश महिला पादत्राणांचं डिझाइन तसंच लूकला प्राधान्य देतात. मात्र त्याऐवजी पादत्राणं आरामदायी आहेत ना याची खात्री करून घ्या. पादत्राणं घालून चालून बघा. दररोजच्या वापरासाठी स्वस्तातल्या चप्पल खरेदी करू नका. चांगल्या ब्रँडच्या नियमित वापरासाठी योग्य चप्पल घाला.



हेअर केअर

### ही काळजी अवश्य घ्या



हेअर कलर करताना काही गोष्टींची काळजी घ्यायला हवी. हेअर कलर करण्याआधी केसांना हायड्रेट करणं गरजेचं आहे. यासाठी केस रंगवायला जाण्याआधी हायड्रेटिंग हेअर मास्कचा वापर करा. यामुळे रंग लावल्यानंतर केस खराब होणार नाहीत तसंच केसांमधला ओलावाही टिकून राहील. केसांना रंग लावल्यानंतर त्यांची काळजीही घ्यायला हवी. रंगवलेल्या केसांसाठी वेगळा शँपू आणि कंडिशनर मिळतो. त्याचा वापर करता येईल. तसंच काही दिवस उन्हात जाणं टाळावं. अशा पद्धतीने रंगवलेल्या केसांचं सौंदर्यही टिकवता येईल.

